प्रकरण दुसरे

# जयप्रकाश नारायण यांचा भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभाग

# प्रकरण दुसरे

# जयप्रकाश नारायण यांचा भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभाग

## २.१ प्रस्तावना :

म. गांधी, पंडीत नेहरू, सुभाषचंद्र बोस इत्यादि नेते इंग्लंडमध्ये उच्च शिक्षण घेऊन हिंदुस्थानातल्या राजकारणात उतरले. तर जयप्रकाशजी अमेरिकेत उच्च शिक्षण घेऊन हिंदुस्थानात परतले. हा एक विलक्षण योगायोग घडून आला होता. त्याचबरोबर इंग्लंडशी स्वातंत्र्यासाठी युद्ध करून विजयी झालेल्या व जन्मापासूनच लोकशाही स्वीकारलेल्या अमेरिकेपासून राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचेही संस्कार घेऊन जयप्रकाशजी आले होते. भावी काळात भारतीय राजकारणात समाजवाद, राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि लोकशाही या तीनही मूल्यांसाठी जयप्रकाशजींनी संघर्ष केला.

ब्रिटीश साम्राज्य सत्तेविरूद्ध भारतीय जनतेने स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सशस्त्र आणि नि:शस्त्र अशा दोन्ही मार्गानी प्रयत्न केले. १८५७ च्या भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्यापासून नेताजी सुभाषचंद्र बोसांच्या आझाद हिंद सेनेने दिलेल्या लढ्यापर्यंत भारतीयांनी हातात हत्यार घेवून केलेल्या स्वातंत्र्य लढ्याचा एक प्रवाह प्रभावी राहिला. तसा हातात हत्यार न घेता नि:शस्त्र जन आंदोलनाचा दुसरा प्रवाहही समांतरपणे प्रवाही राहिला. २८ डिसेंबर, १८८५ रोजी मुंबई येथे अखील भारतीय राष्ट्रसभेची स्थापना झाली. जातीधर्म वर्ग निरपेक्ष राष्ट्रवादाच्या विचारावर ब्रिटीश साम्राज्याविरूद्ध सर्व जातीधर्माच्या व वर्गाच्या भारतीयांनी संयुक्त मोर्चा उभा केला. (United front against British Imperialism)

प्रारंभी अत्यंत मवाळ व सनदशीर धोरण ठेवलेल्या राष्ट्रसभेने कालांतराने जहाल धोरण स्वीकारले. १८८५ रोजी स्थापन झालेल्या राष्ट्रसभेने १९४७ रोजी स्वातंत्र्य प्राप्त केले. राष्ट्रसभेच्या या स्वातंत्र्य लढ्याचे स्थूलमानाने तीन कालखंड पडल्याचे दिसून येतात.

१८८५ ते १९०५ हे मवाळ युग (गोखले युग) १९०५ ते १९२० जहाल युग (टिळक युग) आणि १९२० ते १९४७ सत्याग्रह युग (गांधी युग). ४० कोटी नि:शस्त्र भारतीय जनतेला अहिंसक सत्याग्रहाच्या चळवळीमध्ये महात्मा गांधींनी अहिंसक सत्याग्रहाच्या चळवळीत सहभागी करून जगाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात क्रांती घडवून आणली.

सशस्त्र लढ्यामधील क्रांतिकारकांचे बलीदान आणि नि:शस्त्र लढ्यामधील सत्याग्रही विरांचे बलीदान या दोहोंचेही स्वातंत्र्य प्राप्तीमध्ये महत्वाचे योगदान आहे. भारताचे विद्यमान प्रधानमंत्री जेंव्हा विरोधी पक्षनेते होते तेंव्हा मुंबईत राष्ट्रसेवादलाच्या 'आझादीकी जंग' या कलापथकाच्या कार्यक्रमाचे कौतुक करताना म्हणाले, ''भारतकि आजादीके लिये जो लोग हातमे हतियार लेकर लढे वे तो 'वीर' थे लेकिन जो बिना हतियार लेकर लढे वे तो 'महावीर' थे ।''

१९२० ते १९४७ पर्यंत राष्ट्रसभेतर्फे (कॉंग्रेस) महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये जयप्रकाश नारायण यांचे योगदान १९४२ च्या चलेजाव आंदोलनामध्ये अत्यंत प्रभावी ठरले. स्वातंत्र्य लढ्यामध्ये महात्मा गांधीनी १९२०, १९३०, १९४० आणि १९४२ असे दहा दहा वर्षाच्या अंतराने जनतेच्या लढ्याची हाक दिली. त्यातील १९२० च्या असहकाराच्या आंदोलनाच्या वेळी जयप्रकाश नारायण १८ वर्षाचे कॉलेज विद्यार्थी होते. मौलाना आझाद यांच्या पाटणा शहरात झालेल्या भाषणाने भारावून जाऊन जयप्रकाशजीनी कॉलेजवर बहि:ष्कार टाकला. काही महिन्यांनी चळवळीचा जोर ओसरल्यानंतर इतर विद्यार्थी पुन्हा कॉलेजमध्ये जाऊ लागले. परंतु परकिय इंग्रज सरकारचे अनुदान घेणाऱ्या शिक्षण संस्थेमध्ये आपण शिक्षण घ्यावयाचे नाही हा जयप्रकाशजींचा निर्धार कायम राहिला. त्यांनी डॉ. राजेंद्र प्रसादाच्या बिहार हिंदी विद्यापीठ या राष्ट्रीय शिक्षण संस्थेत प्रवेश घेतला. पुढील उच्च शिक्षण अमेरिकेत जाऊन पूर्ण करावे असे त्यांनी ठरविले. आणि भोलादत्त पंत या मित्राच्या मार्गदर्शनानुसार ते अमेरिकेत गेले. १९२२ ते १९२७ अशी सात वर्षे ते अमेरिकेत राहिले. त्यांनी समाजविज्ञान या विषयाची एम्.ए. ची पदवी संपादन

केली. हे सारे शिक्षण त्यांनी स्वावलंबनाने पूर्ण केले. हॉटेलात वेटरचे, शेतात फळे वेचण्याचे, रस्त्यावर साचलेले बर्फ फोडण्याचे वेळप्रसंगी संडास सफाईचे देखील काम केले. बी.ए. प्रथम श्रेणी मिळवून एम्.ए. चा अभ्यास करताना त्यांना फेलोशिप मिळाली. या अमेरिकेतील वास्तव्यात अब्राहम लेंदी नावाच्या पोलंडच्या विद्यार्थी मित्राकडून मार्क्सवादाची पुस्तके वाचावयास मिळाली. मार्क्स लेनिन, मानवेंद्रनाथ रॉय यांची पुस्तके वाचून जयप्रकाश विचाराने समाजवादी बनले. १९१७ च्या आक्टोबर महिन्यात रशियामध्ये स्थापन झालेल्या लेनिनच्या नेतृत्वाखालील क्रांतीनंतर त्या पहिल्या कामगारांच्या राज्याच्या प्रयोगाकडे ते आकृष्ठ झाले. भारतातही अशा प्रकारची समतेवर आधारलेली समाजवादी समाजरचना स्थापन करण्याचे ध्येय उराशी बाळगूनच ते १९२९ मध्ये भारतात आले.

भारतात येताच आजारी मातेच्या सेवेत रुजू झाले. परंतु मातृवियोगाचे दु:ख त्यांना सहन करावे लागले. त्यातच वडिलांना अर्धांगाचा आजार जडला. पदरेशातून परतीच्या प्रवासासाठी काढलेल्या कर्जामुळे घर आणि शेत सावकाराकडे गहाण पडलेले. अशा अवस्थेत घर चालवण्यासाठी शेवटी महात्मा गांधीजींच्या शिफारशीवरून त्यांना श्री. घन:श्याम दास बिर्ला या भारतातील बड्या भांडवलदाराकडे महिना ३००/- रुपये यावर नोकरी करावी लागली. परंतु नंतर पंडीत जवाहरलाल नेहरूंच्या आग्रहाखातर निमंत्रणानुसार ते व आपली पत्नी प्रभावतीदेवी यांच्या समवेत अलाहाबादमध्ये नेहरूंच्या स्हवासात राहावयास आले. प्रथम काँग्रेस अध्यक्ष या नात्याने जवाहरलालजी जयप्रकाशजींवर काँग्रेसच्या कामगार विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी सोपवली. हे काम त्यांनी इतक्या उत्तम रितीने पार पाडले की, थोड्याच दिवसात अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे कार्यालय मंत्री श्री. राजाराम यांची जागा खाली झाल्यावर ती जबाबदारी जयप्रकाश यांच्यावर सोपविण्यात आली. अलाहाबाद येथील नेहरू घराण्याच्या 'स्वराज्य भवना'मध्ये जवाहरलालजी त्यांच्या पत्नी कमलादेवी आणि जयप्रकाशजी व त्यांच्या पत्नी प्रभावतीदेवी

यांचे खास जिव्हाळ्याचे संबंध जुळून आले. रावी नदीच्या तीरावर लाखो स्त्री-पुरुषांनी संपूर्ण स्वातंत्र्य हे भारताचे ध्येय घोषित केले होते. यामुळे जयप्रकाश नारायण भारावून गेले.

३१ डिसेंबर, १९२९ रोजी रात्री बारा वाजता रावी नदीच्या तीरावर पंडीत जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते तिरंगी झेंडा फडकविण्यात आला आणि थंडीला न जुमानता लाखो भारतीयांनी 'संपूर्ण स्वातंत्र्याची' शपथ घेतली. कोटी कोटी कंठातून संपूर्ण स्वातंत्र्याची प्रतिज्ञा राष्ट्रध्वजाला साक्षी ठेवून उच्चारण्यात आली. म. गांधींनी मिठाचा सत्याग्रह सुरु केला. १२ मार्च रोजी साबरमती ते दांडी अशी महान ऐतिहासिक यात्रा त्यांनी सुरु केली. संपूर्ण स्वातंत्र्य काँग्रेसने घोषित केले. जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस या तरूण नेतृत्वामुळे काँग्रेसमध्ये नवे चैतन्य सळसळू लागले. त्यामध्ये जयप्रकाशजींचीही आता भर पडली. इथे गांधीजींनी जयप्रकाश व जवाहरलाल यांची भेट घडवून आणली.

१९३० ला गांधीजींनी साबरमती ते दांडी अशी पदयात्रा करून समुद्रकिनाऱ्यावर मिठाचा सत्याग्रह सुरु केला. देशभरात तरूण स्त्री-पुरुषांनी या सहकार चळवळीत भाग घेतला. जेथे समुद्र किनारा नव्हता तेथे जंगल सत्याग्रह झाला. या लढ्यात इच्छा असूनही जयप्रकाशांना भाग घेता आला नाही. कारण त्याच सुमारास मृत्युशय्येवरील माता फुलराणीच्या सेवेस त्यांना जावे लागले होते. मातेच्या मृत्युनंतर वडिलांचा अजार वाढला. जयप्रकाश अत्यंत दु:खी झाले. अशावेळी कमला नेहरूंनी प्रभावतींना पत्र लिहिले.

प्रिय बहिण प्रभावती,

जयप्रकाशजींनी येथे येऊन काँग्रेसचे काम सांभाळले पाहिजे. आईच्या मृत्युमुळे देशाचे काम सोडून देणे योग्य नाही. त्यांनी आता भारतमातेची सेवा केली नाही तर त्यांच्या आईच्याही आत्म्यास दु:ख होईल.

- कमला [२]

हे पत्र मिळाल्यानंतर जयप्रकाशांचा निर्णय ठरला. जयप्रकाश काँग्रेसच्या कामाला लागले. थोड्याच दिवसात जयप्रकाशजींच्या वडिलांची तब्बेत बिघडली आणि त्यांचे निधनही झाले. शेटजींची नोकरी अल्पजीवी ठरली. मात्र थोड्याच कालावधीत जवाहरलाल यांनी जयप्रकाश यांना नोकरी सोडून स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. जे.पी. नी नेहरूंच्या बरोबर अलाहाबाद मध्ये काम सुरू केले. १९३१ मध्ये इंग्लंडमधील गोलमेज परिषद झाली व फसली.[३] बोटीतून मुंबईत येताना गांधीजींना अटक झाली. जे.पीं. ना १९३० च्या आंदोलनात सहभागी होता आले नाही याची खंत त्यांच्या मनात डाचत होती. पण कांही दिवसात ही उणीव भरून काढण्यासाठी राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय सहभागी होण्याची संधी त्यांना मिळाली.

१९३० च्या दांडीयात्रेनंतर लॉर्ड इरविन यांनी गांधीजींना बोलावून समझोता घडवून आणला. काँग्रेसवरचे निर्बंध उठविण्यात आले. राजबंद्याना सोडण्यात आले. दुसरी गोलमेज परिषद फिसकटल्यामुळे गांधी आयुर्विन कराराने निर्माण झालेले सलोख्याचे वातावरण संपुष्टात आले. पुन्हा लढ्याची हवा तयार होऊ लागली. भारतात लॉर्ड आयुर्विनच्या जागी कट्टर मतवादी अशा लॉर्ड विलिंग्टन यांची व्हाईसरॉय म्हणून नेमणूक झाली. दडपशाही मार्गाचा अवलंब करून वायव्य सरहद्द प्रांत व उत्तरप्रदेश या दोन राज्यात वटहुकूम जारी करण्यात आला. सरहद्द गांधी, अब्दुलगफारखान यांना पकडून तुरुंगात डांबण्यात आले. महात्मा गांधी लंडनहून येताच त्यांना अटक झाली. येरवडा तुरुंगात गांधींना ठेवण्यात आले होते.

गांधीजींना पकडल्यामुळे देश पुन्हा पेटला. त्यावेळी जयप्रकाश अलाहाबाद येथे नेहरूंच्याबरोबर काम करत होते. गांधींजींना भेटण्यासाठी नेहरू व जयप्रकाश नारायण हे अलाहाबादहून मुंबईला निघाले. तसेच गोलमेज परिषद सफल होऊ शकत नव्हती. यावर विचार करण्यासाठी मुंबईमध्ये काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक बोलावली होती. नेहरू यांच्याबरोबर श्री. तरदुक अहमद शेखानी हेही मुंबईला निघाले होते. सर्व कागदपत्रे घेऊन

जयप्रकाश दुसऱ्या डब्यामध्ये बसले होते. कारण त्यांना माहित होते की नेहरूंना अटक होणार आणि नैनी स्टेशनवर पोहचताच नेहरूंना पकडण्यात आले. यावेळी सावधपणे जयप्रकाशजींनी सेक्रेटरी या नात्याने ते कागदपत्रे घेऊन मुंबईला आले. लॉर्ड विलिंग्डनने काँग्रेस बंद करून बेकायदा ठरविली. काँग्रेसच्या नेत्यांना अटक करण्यात आली. कारण काँग्रेसच्या नेत्यांना अटक करून काँग्रेसपक्ष मेल्याचे जाहीर करण्यात आले होते. ''पण काँग्रेस म्हणजे फक्त नेत्याचे नांव नाही तर ती भारतीय जनतेच्या ज्वलंत आकांक्षाचे नाव आहे. याला मारले जाऊ शकत नाही किंवा नष्ट केले जाऊ शकत नाही.''[४]

नेहरूंना पकडले तरी जयप्रकाशजी सर्व कागदपत्रासह मुंबईला पोहचले नेहरूंना अटक झाल्यावर सरोजनी नायडू यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली होती. जयप्रकाशजी त्यांना गुप्तपणे जाऊन भेटले आणि आंदोलन पुढे चालविण्याच्या संदर्भात इतर नेत्यांशी विचारविनिमय केला. या प्रसंगाने जयप्रकाशजींची चलाखी दिसून आली. आंदोलन पुढे चालू ठेवण्याच्या संदर्भात पुढील वाटचाल करू लागले.

मुंबईतील काम आटोपून जयप्रकाश अलाहाबादला पोहचले. तेंव्हा कमलादेवी आणि प्रभावतीजींना या दोघींनाही पकडून नेले होते. अशावेळी अलाहाबादला थांबण्यात धोका होता. तो ओळखून जे.पीं. परत मुंबईला आले. त्यावेळी जयप्रकाश आणि लालजी मल्होत्रा यांना काँग्रेसचे संयुक्त चिटणीस नेमण्यात आले. ऐकेठिकाणी काँग्रेस कमीटीचे दप्तर थाटले. वेषांतर करून देशभरातील चळवळीचे सुत्रसंचालन ते करू लागले. सर्क्युलर तयार करून पाठविण्यास सुरुवात केली. देशाच्या कानाकोपऱ्यातील कार्यकर्ते, व्यापारी, ऑफिसर एजंट इ. विविध वेषात येऊन भेटू लागले. जयप्रकाश नारायण स्वत: निरनिराळ्या नावांनी देशभर दौरा करून सर्वत्र एकसूत्रता आणत होते. शिथिलता येऊ न देता तरुणांना प्रोत्साहन देत होते. इतकेच नव्हेतर त्यानी या काळात बनारस येथे काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक गुप्तपणे संघटीत केली. या काळातील त्यांचे प्रमुख कार्य म्हणजे इंडिया लीगच्या शिष्टमंडळाचा जो दौरा संघटित केला. त्याचा उल्लेख करावा लागेल. भारतीय स्वातंत्र्य

लढ्याला पाठींबा देण्यासाठी इंग्लंडमधील भारतीय सहानुभूतीदारांची 'इंडिया लीग' ही संस्था काम करीत होती.[५] या संस्थेच्यावतीने भारतातील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी एक शिष्टमंडळ भारतात आले होते. या शिष्टमंडळाचा भारतीय दौरा आखून ठिकठिकाणी महत्वाच्या लोकांबरोबर त्यांच्या भेटी घडवून आणण्याचे काम जयप्रकाशजींनी मोठ्या चातुर्याने पार पाडले. या शिष्ट मंडळाबरोबर फिरत असताना मद्रासमध्ये १९३२ साली त्यांना अटक करण्यात आली. तेथून मुंबईला रवानगी करून मुंबई येथे त्यांच्यावर खटला भरण्यात आला व या खटल्यात त्यांना एक वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली.

## २.२ काँग्रेसच्या मेंदूला अटक :

मुंबई शहरामध्ये गेट वे ऑफ इंडिया समोर ताजमहाल हॉटेल आहे. या शानदार हॉटेलमध्ये भारताची कोकिळा सरोजनी नायडू उतरत्या होत्या. मान्यवर नेत्यांच्या पकडीनंतर नायडूच काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्या होत्या. तेंव्हा जयप्रकाश नारायण त्यांना भेटण्यासाठी पारशी पोशाखामध्ये तिथे पाहोचले. जवाहरलालजींनी जी कागदपत्रे दिली होती. ती नेऊन सरोजनी नायडूंच्या हातात दिली. त्यांनी जे.पी. ना ओळखले. मुंबईचे काम आटोपून जयप्रकाश सरळ आलाहाबादला पोहोचले. तेंव्हा कमला नेहरू व प्रभावतीदेवी या दोघीनीही सत्याग्रह करून कारावास पत्करल्याचे त्यांना समजले. आलाहाबादच्या कामाची आवराआवर करून काँग्रेस आंदोलनाचे गुप्त संघटन करण्याच्या इराद्याने जयप्रकाश मुंबईला आले. मुंबईमध्ये काँग्रेस ऑफीस जे.पीं. नी उघडले. त्याचे प्रधानमंत्री जयप्रकाश झाले होते. या कमिटीमध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या प्रांतानुसार कार्यक्रम तयार केले जात होते. सर्व कार्ये काँग्रेसमार्फत योग्य प्रकारे चालत होती. जयप्रकाश नारायणांनी आपले कार्यकर्ते व्यवस्थित रितीने कार्य करतात कि नाही हे पाहण्यासाठी त्यांनी तीनदा हिंदुस्थानचा दौरा केला. कोणीही वाटेत भेटेल त्याला डोळ्यात डोळे घालून हृदयाच्या आगीपासून जाळून टाकून त्यांना चळवळीमध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त केले जात होते. वेगवेगळ्या मार्गाने कारवाया करत सरकारला हैराण केले जात होते. विलींग्डन साहेबांनी (व्हाईसराय)

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

काँग्रेसला कुचकामी ठरविण्याचे कार्य केले होते. जयप्रकाशांच्या नांवावर काँग्रेसचा बाजाला अधिवेशन सुरू होते. देशातून वेगवेगळ्या ठिकाणाहून कार्यकर्ते आले होते आणि दिल्लीच्या चाँदणी चौकामध्ये अधिवेशन झाले. या चौकामध्ये अचानक ''गांधीजीं की जय'', ''इन्कलाब जिन्दाबाद '' अशा घोषणा सुरू झाल्या. चारही बाजूने तिरंगी झेंडे फडकू लागले. एक व्यक्ती टेबलवर चढून सभापती भाषण देत होते. त्याचवेळी दिल्ली पोलीसांनी या कार्यकर्त्यावर गोळ्यांचा व लाठींचा भडीमार केला. वर्षाव केला आणि कार्यकर्त्यांना पकडून वेगवेगळ्या शिक्षा करून प्रतिष्ठा पूर्ती करण्याचा प्रयत्न केला.

काही दिवसानंतर जयप्रकाश व त्यांचे सर्व कार्यकर्ते यांनी बनारसमध्ये एक गुप्त बैठक घेतली. ही बैठक बाबू शिवप्रसाद गुप्त यांच्या 'सेवा उपवन' घरामध्ये झाली. डॉ. किचलू काँग्रेसचे अध्यक्ष होते. राजेंद्रप्रसाद, राजगोपालचारी, किरणशंकर रॉय, नहामनी, मालवीय इत्यादि देशाचे प्रमुख नेते यामध्ये सामील झाले होते. या मिटींगची बातमी पोलीसांना कळताच शिवप्रसाद गुप्ता यांना अटक करण्यात आली व शिक्षा देण्यात आली. त्याचवेळी भारतीय परिस्थितीचे परिक्षण करण्यासाठी सरकारकडून इंग्लंडच्या 'इंडिया लीग' कडून एक डेलिगेशन भारतात आले होते.[६] त्यावेळी जयप्रकाश नारायण त्यांच्याबरोबर फिरले. वेगवेगळ्या व्यक्तींच्या भेटी घडवून आणल्या. त्यामुळे त्यावेळी जे.पीं. ना अटक झाली नाही. डेलिगेशन मद्रासला गेले.

त्यांच्यासोबत दोन दिवस जयप्रकाश नारायण मद्रासला राहीले. पण तिसऱ्या दिवशी डेलिगेशन कर्नाटकला रवाना होण्यासाठी स्टेशनवर जे.पीं. त्यांच्यासोबत आले. प्रत्येक स्टेशनच्या पोलीसांच्या तोंडात जे.पीं. चे नांव होते. डेलिगेशनला ट्रेनमध्ये बसवून ट्रेन निघाल्यानंतर त्यांना पकडणार होते. कारण ब्रिटीश संसद सदस्य त्यांची पकड बघायला नको होते म्हणून ते गेल्यांनतर परत जयप्रकाश कारकडे येत असताना कारजवळ त्यांना पोलीसांनी विचारले,

''तुम जयप्रकाश हो ? उनसे पुछा गया ।''

"आप क्यो जानना चाहते है ?" जयप्रकाशने पुछा.

"इसलिये की हम तुमको गिरफ्तार करते है ।"

"किस अपराध के लिए ?"[७]

चूकी न सांगता त्यांना गाडीमधून नेण्यात आले. कार ड्रायव्हरने आपल्या मालकाला जे.पीं. च्या अटकेची खबर सांगितली. काँग्रेसच्या भूमीगत सुत्राबरोबर बातमी सर्व देशभर पसरली. राजगोपालचारींनी मद्रास हायकोर्टात अटक अवैध असल्याचा अर्ज केला. पण तो फेटाळण्यात आला. (हेबीअस कार्पसचा) त्यावेळी जे.पीं. ना मद्रासमधून मुंबईला पाठविण्यात आले. कारण ज्या कारणासाठी जयप्रकाशांना अटक करण्यात आले तो वारंट मद्रास मध्ये लागू नव्हता. १९३२ च्या आंदोलनाच्या वेळी जयप्रकाश अगदी तरूण होते. गांधी नेहरूसारखे मान्यवर नेते तुरुंगात असताना व काँग्रेसच्या चळवळीला गुप्त कार्यपद्धतीची काहीही माहिती नसताना त्यांनी ते काम केले. त्यांच्या अटकेनंतर 'फ्री प्रेस' या इंग्रजी दैनिकाने जे.पीं. च्या अटकेच्या वार्तेला 'कॉंग्रेस ब्रेन अरेस्टेड'[८] (Congress Brain Arrested) असा मथळा दिला. या मथळ्याने त्यांच्या उचित कार्याचा गौरव केला. नाशिक येथील तुरुंगात जे.पीं. ना डांबण्यात आले.

## २.३ नाशिकच्या तुरुंगात :

१९३२ चे आंदोलन बाहेर चालू असताना तुरुंगात फार दूरगामी घटना घडत होत्या. येरवडा तुरुंगात महात्माजींना गोलमेज परिषदेत जाहीर केलेला आपला निर्धार पूर्ण करण्यासाठी प्राणांतिक उपोषण सुरु केले. अस्पृश्यापासून व हिंदूपासून वेगळे मतदारसंघ करण्याचे घोरणाला विरोध करण्यासाठी प्राणांतिक उपोषण केले. पण तिला न जुमानता श्री. मॅकडोनाल्डो यांनी गांधीजींच्या अटकेनंतर स्वतंत्र मतदार संघ जाहीर केला. पण अस्पृश्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर यांनी मागणी केली होती. पण तुरुंगात आंबेडकर व गांधी यांच्या प्रदीर्घ चर्चेनंतर वाटाघाटी करण्यात आल्या व गांधी व आंबेडकर यांच्यात येरवडा तुरुंगात एक करार झाला. स्वतंत्र मतदार संघ रद्द झाले. पण लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा

घ्याव्या लागल्या. यावेळी आंबेडकरांनी करार करून राष्ट्रीय वृत्ती दाखवली ती खरोखरच गौरवास्पद होती.

तिकडे नाशिकच्या तुरुंगात जयप्रकाश आणि त्यांचे सहकारी युसूफ मेहरअली, अशोक मेहता, मिनू मसानी, एस्.एम्. जोशी, ना.ग. गोरे वगैरे अनेक तरूण कार्यकर्ते होते. सर्वजण गांधीजींबद्दल आदर बाळगून त्यांच्या धोरणावर टिका करणारे होते. त्यांच्यात्तर भगतसिंग, राजगुरु, चंद्रशेखर आझाद वगैरे क्रांतीकारकांच्या बलिदानाचा प्रभाव होता. रशियात झालेल्या अभुतपूर्व अशा कामगार क्रांतीनेही तरूण प्रभावीत झाले होते. त्याचप्रमाणे मार्क्स व एजल्स यांच्या क्रांतिकारक विचारसरणीने ते भारलेले होते. जयप्रकाशजी अमेरिकेत असतानाच मार्क्सवादी बनले होते. पण मार्क्सवादी असूनही त्यांची देशभक्ती शाबूत असल्यामुळे ते राष्ट्रीय आंदोलनात सहभागी झाले. गांधीजींनी राष्ट्रीय आंदोलन एका टप्प्यापर्यंत आणले आहे. पण ते अधिक तीव्र केले पाहिजे अशी समजूत सर्व तरूणामध्ये प्रकर्षाने निर्माण झाली होती. या दृष्टीने कार्य करण्याची जरुरी आहे याचा विचार त्यांनी आपल्या या कारावासाच्या काळात सुरु केला.

नासिक जेलमध्ये विद्वान, गुणवान, प्रतिभाशाली अनेक व्यक्ती या जेलमध्ये होते. परंतु वेगवेगळ्या सिद्धांताचे लोक होते. शांत स्वभावाचे मुरारजी देसाई होते. प्रखर बुद्धीचे अशोक मेहता होते. मिनू मसानी, राममोहन लोहिया एम्.एल्. दातवाला, एन्.जी. गोरे, अच्युत पटवर्धन इत्यादि व्यक्तीसोबत जयप्रकाशजींची मैत्री कायम झाली.

राजकर्ते समाजातील हिंदू मुसलमान, स्पृश्य, अस्पृश्य, ब्राह्मण, ब्राह्मणेतर वगैरे परंपरागत मतभेदांना खतपाणी घालून भारतीयांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसत होते. या दुहीवर मात करून राष्ट्रीय ऐक्य निर्माण केल्याशिवाय राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ पुढे जाणार नाही याची जाणीव जयप्रकाशजींना होती. धर्माच्या व जातीच्या भेदापलीकडे वर्गीय संघटनांची कास धरली पाहिजे. जाती धर्माचे प्रश्न किसान किंवा युवक या नात्याने एकाच प्रकारचे त्यांना वर्गीय प्रश्नावर एकत्र आणले. तरच या जातीधर्माच्या

फूटपाड्या वृत्तीवर मात करता येईल. म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत मार्क्सवादी विचाराच्या आधारावर जनतेला एकत्र करून संघटित केले पाहिजे.

मार्क्सवादी असूनही जयप्रकाशजवळ ही मानवता होती. अमेरिकेत असताना जयप्रकाश नारायण हे सोव्हियत रशियाकडे आकृष्ट झाले होते. पण हिंदुस्थानात परत आल्यावर तेथील कम्युनिष्ठांचे व सोव्हियत रशियाचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनासंबंधीचे विरोधी व विकृत धोरण पाहून त्यांना मोठा विस्मय वाटला.[१]

रशियात लेनिनच्या मृत्यूनंतर कम्युनिस्ठ पक्षात सत्तेसाठी रणे माजली. लेनिनचा उजवा हात समजला जाणारा ट्रॉटस्कीचा स्टॅलीनने पराभव केला होता. पण हा सत्तेवर आल्यानंतर आंतरराष्ट्रीय कम्युनिष्ठ चळवळ ही सोव्हियत रशियाच्या परराष्ट्र खात्याच्या दावणीला बांधण्यात आली. जेथे राष्ट्रीय आंदोलनाचे पुढारीपण कम्युनिष्ठाकडे नाही तेथे त्या आंदोलनाला भांडवलदारधार्जिणे असे नामाभिधान देऊन विरोध करण्याचे धोरण स्टॅलीनने फर्मावले व त्यानुसार भारतातील कम्युनिस्टही गांधीर्जीना भांडवलदारांचे हस्तक मानू लागले. या सर्व पार्श्वभूमीवर नाशिकच्या तुरुंगात जमलेल्या तरूण समाजवाद्यांचा विचार विनिमय चालू होता. गांधींचा मार्ग अपूरा वाटत होता. कम्युनिष्ठांचा मार्ग सरळ चुकीचा वाटत होता. १९३० सालच्या आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता. पाटणा जेलमध्ये असलेल्या गंगसरण सिंह, रामवृक्ष बेनीपुरीं, फुलनदेवी वर्मा इत्यादि व्यक्तींनी बिहारमध्ये एक समाजवादी गट स्थापन केला. आर्थिक मंदी, बेकारी, उपासमारयांचा जयप्रकाश नारायण यांच्यावर मोठा परिणाम झाला होता की नुसत्या राष्ट्रीय स्वातंत्र्याने गरीबांचे प्रश्न सुटणार नाहीत तर त्यासाठी समाजवादाचा अंगीकार अवश्य केला पाहिजे. भारतात समाजवाद स्थापन करण्यासाठी सर्वप्रथम ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी जोखडापासून मुक्त केले पाहिजे अशी जयप्रकाश नारायणांची भूमिका ठाम होती. कॉंग्रेसला विरोधी अशी जी कम्युनिष्ठांची धारणा होती यामुळे भारतीय कम्युनिष्ठाच्या या धोरणामुळे मार्क्सवादाचे तत्वज्ञान व समाजवादाची कल्पना बदनाम होत होती. म्हणून भारतात

कम्युनिष्ठ रुपाने मार्क्सवादी विचारावर चालणारा एक पक्ष जरी अगोदरच अस्तित्वात असला तरी त्याचा आपणास उपयोग नाही. असा निर्णय झाला. श्रमजिवी कामगार, किसान व तरुण वर्ग यांनाही संघटित करून स्वातंत्र्यलढ्यामध्ये सहभागी करून घेण्याची जरूरी आहे असे तरुनांना वाटू लागले आणि या साठी राष्ट्रीय लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस पक्षांतर्गतच 'काँग्रेस समाजवादी पक्ष' स्थापन करण्याचा निर्णय करण्यात आला. यामध्ये जयप्रकाशजी सक्रिय होते. १९३३ च्या अखेरीस ते नाशिक तुरुंगातून बाहेर पडले. १९३४ च्या जानेवारीत बिहारवर भयंकर भूकंपाची आपत्ती कोसळली. भुकंपग्रस्तांच्या मदतीला जयप्रकाशांनी स्वत:ला वाहून घेतले होते.[१०] यांच्या मदतीसाठी शेतकऱ्यांशी व तरूण कार्यकर्त्यांशी जे.पीं. चा घनिष्ठ संबंध आला.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक पाटणा येथे भरली. देशभरातील समाजवादी विचारांच्या कार्यकर्त्यांचे सम्मेलन पाटणा येथे आयोजित केले होते. १८ मे, १९३४ रोजी झालेले समाजवाद्याचे संम्मेलन आचार्य नरेंद्र देव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी पक्ष स्थापण्याचा निर्णय झाला. ॲडहॉक कमिटीचे चिटणीस जयप्रकाश नारायण झाले.

या नव्या पक्षाचे नांव 'काँग्रेस समाजवादी पक्ष' असे ठेवण्यात आले. पहिले अखिल भारतीय सम्मेलन १९३४ मध्ये मुंबईत भरले. श्री. संपुर्णानंद अध्यक्ष होते. दुसरे मेरठ जानेवारी, १९३६ श्री कमलादेवी यांच्या अध्यक्षतेखाली, तिसरे संमेलन फैजपूर डिसेंबर, १९३६ मध्ये श्री. जयप्रकाश नारायण यांच्या अध्यक्षतेखाली अशी लागोपाठ चार अधिवेशने आणि चौथे संम्मेलन लाहोर येथे एप्रिल, १९३८ श्री मिनू मसानी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.[११] या तरुणांचे नेतृत्व जयप्रकाश नि:स्वार्थीपणे करीत होते.

१९३० मध्ये शेतकरी वर्ग संघटित होऊ लागला. खरीखुरी जागृत शेतकरी संघटना जे.पीं. च्या नेतृत्वाखाली तयार झाली. स्वातंत्र्य लढ्यामध्ये किसान सभा समाविष्ठ झाली.

याखेरीज जयप्रकाश यांनी विद्यार्थी व युवक संघटना स्थापन करून व वाढविण्याकडे लक्ष दिले होते. युवक चळवळीचे संघाला युसुफ मेअहरअलीनी मुंबईमध्ये केले. १९४२ च्या प्रारंभी अखिल भारतीय विद्यार्थी सम्मेलन जे.पीं. च्या प्रेरणेने पाटणा येथे भरले. अध्यक्ष मेहरअली होते. एस्.एम्. जोशींच्या नेतृत्वाखाली सेवादलाची संघटना खेडोपाडी पसरली. समाजवादी पक्षातर्फे ठिकठिकाणी अभ्यासवर्ग चालत असत. जयप्रकाशांच्या मार्गदर्शनाखाली सोनपूर येथे एक ग्रीष्म विद्यालय, समर स्कूल चालत होते. १९४० मध्ये रामगट काँग्रेस अधिवेशनाच्या आगोदरच जमशेटपूर येथे केलेल्या एका भाषणाच्या संदर्भात सरकारने जयप्रकाश नारायण यांना अटक करण्यात आली. सरकारने जे.पीं. ना नऊ महिन्याची शिक्षा फर्मावली आणि त्यांना जेलमध्ये ठेवले.

तुरुंगात इतर राजबंधांना राजकारण, अर्थकारण, विज्ञान इ. विषय शिकवू लागले. गुप्तपणे लेख लिहून ते ''एक काँग्रेस सोशालिस्ट'' या नावाने सर्च लाईट नॅशनल हेराल, बॉम्बे क्रॉमिकल इ. प्रमुख दैनिकातून प्रसिद्ध होऊ लागले. १९४० च्या अखेरीस ते शिक्षा पूर्ण करून तुरुंगातून सुटले.

जयप्रकाश तुरुंगातून बाहेर आल्यावर गांधीनी सत्याग्रह मार्ग सुरु ठेवला होता. सुभाषचंद्रानी आपले कार्य व्यवस्थित पार पाडले होते. जे.पीं. ना वाटले की हा काळ अत्यंत महत्वाचा आहे. देशभर आंदोलन पेटणार याची त्यांना कल्पना होती. गुप्तपणे आंदोलन चालवावे लागणार यासाठी देशभर दौरा करून गुप्तपणे संघटनेचे जाळे पसरत जात होते व अचानक मुंबईला पोहचताच जयप्रकाशांना पकडले गेले.

## २.४ काँग्रेस समाजवादी पार्टीची उद्दिष्टे :

भारताच्या पुनर्रचनेची उद्दिष्टे काँग्रेस समाजवादी पार्टीच्या वतीने उद्दिष्टे पुढीलप्रमाणे घोषित करण्यात आली.

१) सर्व सत्ता उत्पादन करणाऱ्याच्या हाती राहील.

२) देशाच्या आर्थिक जीवनाचा विकास शासन संस्थेने नियोजित व नियंत्रित पद्धतीने करावा.

३) पोलाद, कपडा, ज्यूट, जहाजबांधणी, खाणी, चहाचे मळे वगैरे मुलभूत उद्योगावर तसेच बँका विमाकंपन्या यासारख्या सार्वजनिक क्षेत्रावर समाजाची मालकी असावी. अंतिम उद्दिष्ठ उत्पादन वितरण व विनिमयांच्या सर्व साधनाचे सामाजिकीकरण हे असावे.

४) परकीय व्यापारावर सरकारचा एकाधिकार.

५) संस्थेने जमिनदारी व शोषण करणाऱ्या इतर सर्व प्रवृत्ती विनामोबदला नष्ट करणे.

६) शेतकऱ्यांमध्ये जमिनीचे फेरवाटप व शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या सर्व कर्जांना माफी.

७) शासनातर्फे प्रत्येकाच्या काम करण्याच्या हक्काला मान्यता.

८) प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे काम करावे व त्याला गरजेप्रमाणे वेतन मिळावे. [१२]

जयप्रकाशजींनी 'व्हाय सोशालिझम' (समाजवादच का ?) या नावाचे पुस्तिका लिहिलेले काँग्रेस तरुणामध्ये अत्यंत लोकप्रिय ठरले. जयप्रकाशांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस समाजवादी पक्षाच्या तरुणांनाही प्रोत्साहन मिळाले. परकिय सत्ता गेल्यानंतर येणाऱ्या भारतीय स्वकिय सत्तेमध्ये शेतात राबणारे शेतकरी आणि कारखान्यात राबणारे कामगार यांचा महत्वाचा वाटा असेल असे स्पष्ट अस्वासर्न या ठरावात देण्यात आले.

## २.५ साम्राज्यवादी विरोधाच्या आघाडीवर जयप्रकाश नारायण :

त्रिपुरा काँग्रेसमध्ये झालेल्या मतभेदानंतर लवकरच महायुद्ध सुरु झाल्यामुळे भारतीय राजकारणातही नवे प्रश्न उपस्थित झाले. एप्रिल मध्ये ब्रिटनने भारतीय सेना पाठवायला सुरुवात केली. त्यावेळी नेहरुंनी चेतावणी दिली की, ''भारतीय जनता निर्णय घेणार की

14412
A

युद्धामध्ये सहभागी व्हायचे की नाही. १९३९ च्या सप्टेंबर महिन्यामध्ये युद्ध सुरू झाले हे साम्राज्यवादी युद्ध आहे. आपण त्याला कडा विरोध केला पाहिजे अशी भूमिका जयप्रकाश नारायण यांनी घेतली. काँग्रेसने ब्रिटीशांना आपले युद्धहेतू जाहीर करण्याचे आव्हान दिले. ब्रिटीशांनी युद्धहेतू जाहीर न केल्यामुळे या भूमिकेमुळे मंत्रीपदाचे राजीनामे दिले व असहकाराचे धोरण स्वीकारले. स्वातंत्र्यासाठी देशव्यापी समुदायिक चळवळ ताबडतोब सुरु करावी असे त्यांचे म्हणणे होते. पण सामुदायिक चळवळ काँग्रेसच्या नेतृत्वाखाली झाली तरच प्रभावी व यशस्वी होऊ शकेल इतर कोणाची प्रभावी चळवळ सुरु करण्याची शक्ती नाही असे जयप्रकाश म्हणत होते.

वाईसराय लॉर्ड लिनलिथनो याने गांधी आणि अन्य पन्नास भारतीय नेत्याबरोबर चर्चा केली. यांनी मागणी केली की, महायुद्ध संपल्यानंतर भारताला 'डोमीनिमन स्टेटस्' जाहीर करावे. १७ ऑक्टोबरला काँग्रेसच्या जलद स्वातंत्र्य द्यायच्या मागणीला ठोकर दिली. त्यानंतर २२ ऑक्टोबरमध्ये काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक वर्धामध्ये झाली. व्हाईसरायच्या या वक्तव्याला साम्राज्यवादी धोरण ठरविण्यात आले. वर्किंग कमेटी के लिए यह संभव नहीं है किं वह ग्रेट ब्रिटेन का समर्थन करे । समर्थन का मतलब होगा कि कमेटी उस साम्राज्यवादी निती को सही मानती है जिसे खत्म करने के लिये काँग्रेस कोशीश करती आ रही है ।[१३]

जयप्रकाश आणि काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टी युद्धाला प्रखर विरोध करत होते. ''जहा तक हमारा सवाल है'' जयप्रकाश म्हणतात, हम मित्र राष्ट्रो को न तो किसी उलझन में फॅसाना चाहते है और न हम उनके लिए कोई कठिनाई उत्पन्न करना चाहते है. लेकिन हमे अपनी स्वतंत्रता के लिए संघर्ष करना है और हमारे संघर्ष के कारण उनके लिए कोई समस्या उठ खडी होती है तो दोष हमारा नही, उनका ही है । हम स्वतंत्रता प्राप्त कर लें तो हम उनके कंधे से कंधा मिलाकर हर प्रकार के अत्याचार विरूद्ध ''वह अत्याचार नाजी करे, साम्राज्यवादी करे या पुंजीवादी करे, लडने के लिए तैयार है ।''[१४]

युद्धासंबंधी आपली भूमिका स्पष्ट करणारे एक निवेदन जयप्रकाश नारायण यांनी १९३९ च्या डिसेंबरमध्ये प्रसिद्ध केले. त्यामध्ये पुढील कार्यक्रम दिला होता. १) युद्ध विरोधी प्रचारासाठी काँग्रेस कमिट्यांना कार्यक्षम बनवणे, २) येथे भाषणस्वातंत्र्यावर बंधणे घातली असतील तेथे ती मोडणे, ३) स्वयंसेवक संघटना बळकट करून आगामी लढ्याची तयारी करणे, ४) किसान कामगारांची संघटना चालू ठेवणे.[१५] मात्र हे कार्य करताना काँग्रेसला दुर्बल करण्याविरूद्ध त्यांनी इशारा दिला होता. १९४० च्या मार्च महिन्यात रायगड येथे काँग्रेसचे अधिवेशनात काँग्रेसने युद्धविरोधी व्यापक आंदोलनाची भूमिका स्वीकारावी म्हणून जयप्रकाश व त्यांचे जेष्ठ सल्लागार आचार्य नरेंद्रदेव यांनी महात्मा गांधींची भेट घेतली. त्यातून आशेचे वातावरण निर्माण होऊ लागले.

युद्ध सुरू झाल्यानंतर काँग्रेस समाजवादी पार्टी व काँग्रेस यांची बैठक 'अंजुमन इस्माईल हॉल' मध्ये बोलावली गेली. सभापती नरेंद्रदेव होते. या आम सभेमध्ये जयप्रकाशजीने हे युद्ध साम्राज्यवादी युद्ध आहे. असा प्रचार केला. यानंतर पार्टीच्या कार्यसमितीची बैठक लखनऊमध्ये झाली. यामध्ये घोषणापत्र प्रकाशित केले. वर्धा येथे कार्यसमितीची बैठक बोलावली होती. त्यामध्ये जयप्रकाश नारायण यांना आमंत्रित केले होते. कार्य समितीच्या बैठकीमध्ये जयप्रकाश यांनी भाषण केले की, "देश के सामने तीन नीतीयाँ थीं । पहली थी महात्मा गांधी कि नती, जो कि ब्रिटेन के बिन शर्त सहायता देने के पक्ष में थी, यद्यपि वह सहायता सिर्फ नैतिक सहायता थी । दुसरी नीती हमारी पार्टी की थी. युद्ध का और ब्रिटीश सरकार का जो कि हिन्दुस्तान को उसमे घासीट रही थी, उसे बिना शर्त के विरोध करना । इसका अर्थ अविलंब जनसंग्राम था ।"[१६] असे भाषण केले. काँग्रेस कार्यसमितीने मंत्रीमंडळाचा राजीनामा व नवीन कार्यक्रम करण्याचा त्याचा विचार होता. या परिस्थितीत जयप्रकाश पार्टीचे प्रधानमंत्री होते त्यांच्यातर्फे काँग्रेसचा कार्यक्रम जाहीर केला. १) सभा, हरताळ, मिरवणूका, पुस्तिकाच्या मार्फत युद्धाविरोधी प्रचार, २) स्वराज्य पंचायत संबंधी प्रचार स्वराज्य पंचायतीची व्याख्या त्यांचा निर्माण आणि कमी करण्याच्या प्रयासांचा

प्रचार, ३) देशव्यापी सविनय अवज्ञा आंदोलन प्रचार करबालमजुरी यावरती जोर देण्यात आला. ४) जनसंग्राम मधील भरती व प्रशिक्षण देणे, ५) काँग्रेस कमिटीला सक्रिय बनविणे, ६) शेतकरी व मजूर आंदोलनात सक्रिय करणे, ७) विद्यार्थ्यांनी शिक्षण सोडून चळवळीमध्ये सक्रिय सहभागी होणे, ८) अनुशासनाचे पालन करून रचनात्मक कार्यक्रम तयार करून ते पूर्ण करणे, हा कार्यक्रम जयप्रकाशांनी ठरविला होता.

परंतु जयप्रकाश यांची पार्टी सर्वात जास्त प्रयत्न करून साम्राज्यवादी युद्धाला विफल करण्याचा प्रयत्न करत होते. त्याचवेळी त्रिपुरा काँग्रेसमधील सभापती म्हणून सुभाषचंद्र बोस निवडून आले. यामध्ये पार्टीने आपली सर्व ताकद लावून डॉ. पट्टाभिसितारामैय्याला हरविण्यात आले. यांच्या हारण्यामुळे गांधीच्या समर्थकांनी राजीनामे दिले. गांधीने स्वतःची हार समजली. काँग्रेसमध्ये फूट पडत होती. जयप्रकाशने यांच्यामध्ये समझोता करण्याचा प्रयत्न केला.

त्रिपुरानंतर कलकत्ता अधिवेशनात गांधीवादी लोकांनी मानले की सुभाषबाबू सभापती व जवाहरलाल मंत्री. पण त्यावेळी सुभाषबाबूंनी राजीनामा दिला आणि 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाची पार्टी स्थापन केली. काँग्रेस हे गृहयुद्धाचा आखाडा बनला. यावेळी जयप्रकाशांनी लेख लिहून ही परिस्थिती निभावण्याचा प्रयत्न केला.

या वर्तमान परिस्थितीमध्ये महात्मा गांधीवर मोठा बोजा होता. महात्मा गांधीना व्हाईसरायवर विश्वास होता. चेंबरलेनबरोबर करार करून स्वतंत्रता न्याय व शांती स्थापनाची बिजे रोवले जात होती. यावेळी जयप्रकाश यांनी आपले प्रचाराचे कार्य करून ते मोर्चेबांधणी करण्यामध्ये मग्न होते. भिन्न भिन्न प्रदेशात अनेक कार्यकर्ते अटक केले जात होते. जयप्रकाश मजूरांच्या बैठकीमध्ये आम सभामध्ये भाषन करत होते. या युद्धामुळे आम्हाला संधी दिली आहे की, भारतीय मजुरांना शोषनापासून मुक्त होण्याचा व ब्रिटीश शासन समाप्त करण्याचा, गांवामध्ये जयप्रकाश म्हणत होते की, ''लगान और मालमजूरी देना बंद करो. अपनी सरकार बनाओ, अपने थाने बनाओ, आपणी आंदालने बनाओ,

अंग्रेजी शासन का बहि:ष्कार करो । मजदूरों कि सभामे वह कहते, 'रेल्वे, डाक खानो सुरक्षा संस्थानो मे और सरकारी दफ्तरो मे आम हडताल करके आपना शासन आपने हाथो मे ले लो ।''[१७]

रायगडला काँग्रेस लढ्याचा निर्णय घेणार असा रंगारंग दिसू लागला. पण त्याच सुमारास जयप्रकाश यांनी जमशेटपुर येथे केलेल्या एका युद्धविरोधी भाषण केले. १८ फेब्रुवारी १९४० मध्ये जमशेटपूर मध्ये टाटा इस्पातच्या कारखाना मजूरांच्या सभामध्ये भाषण करताना जे.पीं. नी अनुरोध केला की, ''जर्मनीबरोबर चालू असलेले युद्ध बंद करा. त्यांना सहकार्य बंद करा. ब्रिटीश शासनाचा तक्ता पलटून टाका. आशियामध्ये सर्वात मोठा कारखाना इस्पात चा आहे. हा कारखाना बंद करा. कारण लढाई चालविण्यासाठी लागणारे इस्पात बनवायला नको. मी आपज्याकडून संप करण्याची मागणी करतो.'' या सभामध्ये तैनात पुलीस मॅजिस्ट्रेट, थानेदार, सी.आई.डी. चे रिपोर्टर होते. जे.पी. चे भाषण हिंदी शॉर्ट मध्ये लिहित होते. त्यांच्या साक्षी आधारावर जयप्रकाशांना अटक केली. त्यांच्यावर कायद्याने ''१९३९ के पैतिसवे अधिनियम भारत सुरक्षा कानून तथा १९३९ के पाँचवे अधिनियम के अंतर्गत बने. १९३९ के भारत सुरक्षा नियमों के नियम ३८(५) तथा नियम ३८(१) तथा ३४(६)(ज) व (भ) या नुसार आरोप लावण्यात आले.''[१८] युद्धविरोधी भाषणाच्या विरूद्ध रामगड काँग्रेसच्या १९४० च्या अगोदर अटक केली.

मॅजिस्ट्रेट समोर जयप्रकाशने कबुली दि की ''मुझपर यह दोष लगाया गया है कि मैने युद्ध को सफल बनाने के लिये जिन अस्त्रशस्त्रों और दुसरे जरूरी सामानो की आवश्यकता है उनके बनने में रोडे अँटकावे की कोशिश की है और हिन्दुस्थान की रक्षा के लिए जनता के जिस रूख और मनुवृर्ती की जरूरत है उसपर विरोधी प्रभाव डालने की चेष्टा की है । मैं इस दोष को सानन्द स्विकार करता हूँ । क्योंकी इस दोष को मै अपराथ नही समक्षता बल्की अपना कर्तव्य समक्षता हँ, और उसके लिए मिलनेवाली सजा को हँस हँसकर झेलने को तैयार हूँ । तलवार कि ताकत पर कायम रहनेवाली विदेशी हुकूमत के कानून इसको जुर्म सनझते है

इसकि मुझे परवाह नहीं. इन कानुनों का उद्देश्य उस राष्ट्रीय भारत के लक्ष्यों के सर्वथा विपरीत है जिसका मै एक तुच्छ प्रतिनिधी हूँ । यह स्वाभाविक ही है हमारी मुठभेड उस कानून से हो ।"[११]

सिंहभूमीमध्ये १५ मार्चला न्यायालयासमोर त्यांनी आपला गुन्हा कबूल केला. त्यांनी म्हटले की मी जर्मनीला सहाय्य देण्याचे नाकारत आहे आणि जर्मनीचा विजय मला नको आहे. किंवा साम्राज्यवादाचा विजय नको आहे. या वर्तमान स्थितीमध्ये ब्रिटीश साम्राज्यबरोबर लढून त्यांचा अंत करण्याशिवाय कोणताही उपाय नाही असे करून भारतात, विश्वामध्ये शांती आणि समृद्धीसाठी योगदान करू शकतो. दास्यांचे कर्तव्य आहे की आपल्या साखळदंडाना तोडणे.

जयप्रकाशच्या या वक्त्यावरून डीप्टी कमिशनर एस्.डब्ल्यू. रसेल यांना त्यांच्या सज्जतेवर धन्यवाद देऊन त्यांचा वक्तव्य भाषणाची एक प्रत गांधीजींना पाठविण्यात आली. २७ मार्च जयप्रकाशांना नऊ महिन्याची शिक्ष सुनावण्यात आली.

गांधींनी अटकेचा निषेध करणारा लेख 'हरीजन' मध्ये लिहिला. जयप्रकाशनी कोर्टासमोर दिलेली जबानी हरीजन मध्ये लिहिली व जयप्रकाश यांनी काँग्रेसच्या युद्धविरोधी धोरणांचा उत्कटपणे पुरस्कार केल्याबद्दल त्याचे अभिनंदन करण्यात आले.

जमशेटपूर जेलमध्ये त्यांना ठेवण्यात आले होते. बाहेरची बातमी वर्तमान पत्राद्वारे त्यांना माहीत होत होती. त्यांना परत हजारीबाग जेलमध्ये ठेवण्यात आले होते. या तुरुंगात जयप्रकाशजी इतर राजबंद्यांना राजकारण अर्थकारण, विज्ञान इ. विषय शिकवू लागले. बनारस हिंदू विद्यापीठात प्रोफेसर बनवण्याची जे.पीं. ची हौस जहारीबाग जेलमध्ये पूर्ण होऊ लागली. गुप्तपणे लेख लिहून ते 'एक काँग्रेस सोशालिस्ट' या नावाने 'सर्चलाईट', नॅशानल हेरल्ड, बॉम्बे क्रोनिकल इ. प्रमुख दैनिकातून प्रसिद्ध होवू लागले. १९४० च्या अखेरीस पूर्ण शिक्षा भोगून जे.पीं. तुरुंगातून सुटले.

गांधीजींनी यावेळी देशात वैयक्तिक सत्याग्रह सुरु केला होता. युद्धविरोधी घोषणा देऊन सत्याग्रह करावयाचा, परंतु सरकारी युद्ध प्रयत्नात अडथळा आणून शत्रूराष्ट्रांना मदत होईल असे काही करायचे नाही अशी मध्यममार्गी भूमिका गांधीनी देशांपुढे ठेवली होती. जे.पीं. गांधीना भेटले. सुभाषबाबूंना भेटले हा काळ महत्वाचा आहे. हे ओळखून देशभर प्रचंड आंदोलन जनतेमध्ये पेटणार आहे याची त्यांना कल्पना होती. गुप्तपणे भूमिगत आंदोलनाचा दौरा केला. बंगाल बिहार संयुक्त प्रांत व गुजरातचा दौरा केला. अचानक मुंबई येथे पोहचताच जयप्रकाशांना अटक करण्यात आली.

काही दिवस मुंबई येथील ऑर्थर रोड जेलमध्ये ठेवल्यावर जे.पीं. ना देवळी जेलमध्ये डांबण्यात आले. देवळीच्या तुरुंगात येताच त्यांच्या लक्षात आले की आता आपली सुटका लवकर होणार नाही. त्यामुळे बाहेरील चळवळीशी संबंध ठेवण्यासाठी कायम धडपडत होते. याच सुमारास युद्धविरोधी प्रचारासाठी हिंदुस्थानातील इतर कित्येक समाजवादी व कम्युनिस्ठ नेत्यांना पकडण्यात आले होते. अजमेर हे ब्रिटीश आंमलाखालचे लष्करी ठाणे होते. अजमेर जवळ ओसाड वाळवंटात देवळीचा कुप्रसिद्ध ठावणी उभारण्यात आली होती. तेथे स्थानबद्धांना डांबण्यात आले होते. त्यातच जयप्रकाशजींची रवानगी करण्यात आली होती.

जयप्रकाश या देवळीच्या छावणीत असतांना दोन अशा घटना घडल्या त्यामुळे जयप्रकाश नावाची देशभर प्रसिद्धी झाली. तुरुंगाबाहेरची परिस्थिती दिवसें दिवस बिघडत चालली होती. अशा परिस्थितीत तुरुंगाबाहेर आपल्या सहकाऱ्याबरोबर संपर्क साधण्यासाठी ते फार बैचैन होते. एका छोट्या तुरुंगाधिकाराचा विश्वास त्यांनी संपादन केला व त्यांच्यामार्फत बाहेर काही संदेश पाठविण्याचा प्रयत्न केला. पण ऐनवेळी अधिकारी घावरल्यामुळे त्यांना या कामासाठी स्वतः धाडस करावे लागले. बाहेर पत्रे पाठविण्याची त्यांची तीव्र इच्छा होती.

जे.पीं. ना भेटायला प्रभावतीदेवी आल्या. त्यांच्या मार्फत बाहेर पाठविण्यासाठी जे.पी. नी पत्रे लिहून गुप्तपणे आणली. परंतु जेलच्या पोलीस ऑफीसरसमोर पत्रे कशी देणार ? जे.पीं. नी एक मजेदार उपाय शोधून काढला. एका कागदावर स्वतःच्या पात्राचे माप काढून तो कागद प्रभावतीदेवीपुढे ठेबलावर ठेवला. 'या मापाची चप्पल पाटवून दे ।' असे सांगून पोलीस ऑफिसरला सूचवले. बघून घ्या या कागदावर केवळ पायाचे माप आहे । ऑफिसर कागद आलटून पालटून पाहू लागला की एखादा संदेश गुप्त रितीने लिपीत लिहिला आहे की काय ते पाहू लागला. तेवढ्यात डोळा चुकवून आणलेल्या पत्राचे एक पुडके प्रभावती पुढे जे.पीं. नी हळूच सरकावले. ते तात्काळ उचलून आपल्या बॅंगमध्ये गुपचूप ठेवणे प्रभावतींना शक्य होते. पण त्या होत्या गांधीवादी ! गुप्त कारस्थानात सहभागी होवून सरकारी अधिकाऱ्याशी धोकेबाजी त्या कशा करणार ? त्यांनी त्यापुडक्याला हात देखील लावला नाही. जयप्रकाश अत्यंत अस्वस्थ झाले. चुळबूळ करू लागले. प्रभावतीदेवी आणि जयप्रकाश यांचे चेहरे लाल झाले । विलक्षण तणावाची स्थिती निर्माण झाली. तेवढ्यात ऑफीसरची नजर गेली आणि त्याने तात्काळ झडप घालून पत्राचे पुडके हस्तगत केले. जे.पीं. ना धक्का बसला. ऑफीसरला खाली पाडले. गार्ड, गार्ड, म्हणून तो ओरडताच इतर पोलीस तेथे आले. मुद्देमालासहीत जेल सुपरिंटेंडेंडपुढे जे.पीं. ना उभे केले. खूप बाचाबाची झाली. या कृत्याबद्दल तुम्हाला काही पश्चाताप होत नाही ? असा प्रश्न आला. जे.पीं. नी उत्तर दिले. "मुळीच नाही. दुःख फक्त याच गोष्टीच वाटत कि या कामात पहिल्यांदा अपयश आलं ।"[२०]

सरकारने या पत्राचे फोटो वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केले. गांधींचे अनुयायी कसे कारस्थानी आहेत. याचा डांगोरा जगभर पिटला. जे.पीं. पत्रे एक राजकिय दस्ताव ऐवज म्हणून महत्वाची ठरली. कारण या पत्रातून त्यांनी सोशालिस्ट पार्टीने कसे काय करावे, भूमिगत चळवळ कशी चालवावी, बेकायदेशीर वृत्तपत्र कसे काढावे याचे मार्गदर्शन होते. नीधी गोळा करणे, परदेशाशी संबंध प्रस्तावित करणे, देवळी जेलशी संबंध जोडणे इ. बाबत सूचना

होत्या. कम्युनिस्ठांच्या देशद्रोही कारवायावरही या पत्रातून प्रकाश टाकला होता. यातील एक पत्र प्रभावती देवींना उद्देशून होते आणि दोन पत्रे श्री. पुरुषोत्तम दास यांचे नांवे लिहिलेली होती. सर्व देशभर या पत्रामुळे प्रचंड वादळ उठले.

हे पत्र प्रसिद्ध करून महात्मा गांधींच्या व सर्वसाधारण काँग्रेसजनांच्या मनात जयप्रकाश जहाल दहशतवादी आहेत असा ग्रह निर्माण करण्याचा हेतू होता. पण ह्या स्वत: महात्मा गांधींनीही त्यांचा ग्रह मोडून काढला. तथाकथीत गुप्त कागदपत्रे प्रसिद्ध झाल्यावर चार पाच दिवसात स्वत: गांधीजींनीं वर्धाहून निवेदन केले. त्यामध्ये ते म्हणतात, ''जयप्रकाश नारायण यांनी तुरुंगाबाहेर गुप्तपणाने जे पत्रक पाठविण्याचा प्रयत्न केला असा सरकारचा आरोप आहे. ते प्रसिद्ध करून सरकारने काय साधले जर हे प्रसिद्ध करण्यात ज्या संघटनेचे जयप्रकाश सदस्य आहेत तिला बदनाम करण्याचा हेतू असेल तर तो फसला आहे. जयप्रकाशवर जे आरोप क्षणभर खरे धरले तर त्यांनी सुचविलेला मार्ग काँग्रेसच्या सत्य व अहिंसेच्या धोरणाविरूद्ध आहे व त्याबद्दल त्यांचा निषेध करण्याचा अधिकार काय ? सर्व जगभर युद्धात वापरावयाचे जे मार्ग मान्य आहेत त्यानुसार जयप्रकाश यांनी अवलंबलेली पद्धत योग्यच ठरेल. ज्या पद्धतीने सनसनाटी पद्धतीने सरकारने या घटनेला प्रसिद्धी दिली ती तर अगदीच मुर्खपणाची आहे.''[२१]

महात्मा गांधी म्हणतात की, काँग्रेस जनांना मला सांगायचे आहे की जयप्रकाशांच्या देशमुक्तीबद्दल कोणालाही शंका घेण्याचे कारण नाही. देवळीच्या तुरुगात असताना आणखीन एक महत्वाची घटना घडली. ती म्हणजे देवळी तुरुंगातील राजबंद्यांनी आपल्या काही हक्कासाठी दिलेला लढा.

## २.५ जयप्रकाशजींचे तुरुंगातील उपोषण :

जयप्रकाशांना जमशेटपूर येथे युद्धविरोधी भाषणाबद्दल अटक करण्यात आली. तेथून त्यांना देवळीच्या तुरुंगात ठेवण्यात आले. देवळीची हवा फारच खराब होती. अनेक

राजबंद्यांना मानवत नव्हती. राजबंद्यामध्ये 'अ' व 'ब' असे वर्गीकरण केले होते. तेही जयप्रकाशजींना मान्य नव्हते. जयप्रकाश याला कुटुंब मानत होते. त्यांच्या कुटुंबाचे हाल चालले होते. या सर्व परिस्थितीचे निराकारण व्हावे म्हणून छावणीतील राजबंद्यांनी पुढील मागण्या केल्या होत्या.

१) सर्व स्थानबद्धांना आपापल्या प्रांतात परत पाठवावे.

२) स्थानबद्धांमध्ये असलेले वर्गीकरण रद्द करून सर्वांना समान दर्जा द्यावा.

३) स्थानबद्धांच्या कुटुंबियांना भत्ता देण्यात यावा.

४) अन्न व वैद्यकिय मदत देण्यात यावी.

ही बातमी बाहेर येताच देशभर मिरवणूका व निदर्शने उफाळून आली. या मागण्याचा विचार करण्यासाठी १३ दिवसांची मुदत देण्यात आली. पण उत्तर न मिळाल्यामुळे २३ ऑक्टोबर, १९४१ रोजी देवळीच्या छावणीमधील २०८ राजबंद्यानी अन्न सत्याग्रह केला. या सत्याग्रहाचे नेतृत्व जयप्रकाश यांच्याकडे होते. हा अन्न सत्याग्रह चालू असताना तुरुंगातील व तुरुंगाबाहेरील कम्युनिस्ठांनी आपल्या नेहमीच्या पक्षबाजीसाठी दुरुपयोग करण्याच्या हेतूने अन्न सत्याग्रहात सहभागी होण्याचे कबूल करूनसुद्धा सहभागी झाले नाहीत. यामुळे तरूण वर्गात असंतोष निर्माण झाला. सर्व शहरात विद्यार्थ्यांनी हरताळ व मिरवणूका काढून 'देवळी दिन' साजरा केला होता. असेंबलित अनेक प्रश्न लोक प्रतिनिधींना विचारण्यात आले होते. पण त्यांनी सांगितले की अन्न सत्याग्रह मागे घेतल्याशिवाय निर्णय घेता येणार नाही. सूचना दिली होती तरीसुद्धा निर्णय नाही त्यामुळे राजबंदी हट्टाला पेटले. आमच्या मागण्या मान्य झाल्याखेरीज आम्ही माघार घेणार नाही असे बजावण्यात आले. यांच्या मागण्यांना पाठींबा देण्यासाठी देशभर मोठी चळवळ सुरू होती. 'राजबंद्यांच्या मागण्या मान्य करा, देवळी तुरूंग बंद करा ।' या घोषणांनी देवळी तुरूंग दुमदुमू लागला. वातावरण चिघळत गेले. माघार घेत नव्हते. राजबंद्यांची प्रकृती ढासळू लागली. प्रकृती गंभीर होत होती. ना.म. जोशी प्रभृती नेमस्त पुढाऱ्यांनी स्थानबंद्याना भेटून

UNIVERSITY KOLHAPUR

समजूत काढण्याचा प्रयत्न केला. हा अन्न सत्याग्रह ३३ दिवसपर्यंत चालू होता. जयप्रकाशजींचे नाव सर्व देशभर प्रसिध्द झाले. ६० वर्षाचे देखील राजबंदी सहभागी झाले होते. अखेर तडजोड होऊन सरकारने देवळी छावणी बंद करण्याचे व राजबंद्यांना आपापल्या प्रांतात पाठविण्याचे मान्य केले. तेव्हा लढा संपला व जयप्रकाश नारायण यांची बिहारच्या हजारीबला तुरुंगात रवानगी करण्यात आली.

उपोषनाने प्रश्न सुटत नसतात. अशी जयप्रकाशांची पूर्वी भूमिका होती. गांधीजींचा उपोषणाचा मार्ग त्यांना पटत नव्हता. परंतु तुरुंगात जेव्हा जयप्रकाशांना कोणताच मार्ग सापडेना तेंव्हा त्यानी उपोषण करावयाचे ठरविले होते व गांधीजींच्या उपोषणावर टिका करणाऱ्या मार्क्सवादी व भौतिकवादी जयप्रकाशांनी गांधीजींचा उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता [२२] व ते यशस्वी झाले.

देवळी तुरुंग बंद पाडून हजारीबाग जेलमध्ये गेल्यावर पुढे त्यांना १९४२ च्या 'चलेजाव' चळवळीमध्ये सहभागी होणे शक्य झाले. या अन्न सत्याग्रहात तुटपुंज्या अशा केंद्रीय विधानसभेत चर्चा झाली त्यानंतर ३५ वर्षांनी पुन्हा जे.पीं. ना विनाचौकशी स्थानबद्ध करण्यात आले तेंव्हा 'सार्वभौम' लोकसभेत त्यांच्या वाच्यतादेखील करण्यास परवानगी नव्हती. वर्तमानपत्रात त्याचा उल्लेख नाही अशी स्वराज्यात गुलामगिरीची, स्वातंत्र्यात, पारतंत्र्याची परिस्थिती निर्माण झाली व आयुष्याच्या अखेरीस पुन्हा एकदा स्वातंत्र्यासाठी जयप्रकाश यांना अग्निदिव्यातून जाण्याची वेळ आली.

## २.७ बेचाळीसच्या क्रांतीचे सेनानी :

दुसऱ्या महायुद्धात गट्टी राष्ट्रांची सरशी होत चालली होती. हिटलर मुसोलोनिनी युरोप पादाक्रांत केला. आशियात जपान हिन्दुस्थानच्या सरहद्दीपर्यंत येऊन उभा राहिला होता. सुभाषचंद्र बोसांनी गुप्त रितीने देशाबाहेर जाऊन सशस्त्र आझाद हिंद सेना उभी केली होती. क्रिप्स शिष्टाई असफल झाली. युद्ध कार्यात मदत करा, नंतर हिंदुस्थानला स्वराज्य

देऊ ! असे सांगणारी क्रिप्स योजना म्हणजे बुडत्या बँकेचा पुढच्या तारखेचा चेक आहे ! असे उद्‌गार महात्माजींनी काढले. आता वैयक्तिक सत्याग्रह पुरेसा नाही. हिन्दी जनता या राष्ट्रीय सुवर्ण संधीच्या अनुकुल काळात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी उठाव करण्यास तयार आहे हे गांधीनी जाणले. मुंबई येथे ७ व ८ ऑगस्ट १९४२ या तारखांना अखिल भारतीय काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेषन झाले. 'जले जाव !' या क्रांतिकारक ठराव पास करून ब्रिटीशांनी हिंदुस्थान सोडून चालते व्हावे असे बजावण्यात आले. इंग्रज गेल्यावर येणाऱ्या स्वराज्यात शेतात राबणारे शेतकरी आणि कारखान्यात राबणारे मजूर यांच्या हाती राज्यकारभाराची मुलभूत सुत्रे येतील असे आश्वासन या ठरावात देण्यात आले. जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमधल्या तरूण समाजवादी शक्तीचा व तात्त्वीक विजय होता. जनतेचा सामुदायिक उठाव करण्याला ही वेळ अनुकूल आहे अशी मागणी जयप्रकाश करीत होते. महात्माजींनी त्यांना प्रतिपाद दिला. प्रथम सरकारशी वाटाघाटी करून गांधीजी चळवळीची दिशा आखून देणार होते. परंतु सरकारने दडपशाहीचे तंत्र अवलंबून गांधी, नेहरू व वर्किंग कमिटीचे अन्य नेते यांना अटक करण्यात आली.

सर्व नेत्यांना पकडल्यामुळे नेतृत्वहीन जनता काही प्रतिकार न करता निमुटपणे स्वस्थ बसेल अशी इंग्रज सरकारची कल्पना होती. ती फोल ठरली. नेत्यांना अटक केल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. दुसऱ्याच दिवशी ९ ऑगस्टला जनतेने राष्ट्रव्यापी संप पाळला. मोर्चे, सभा, मिरवणूक निघाल्या. तरूण विद्यार्थी सेवादल सैनिक, कामगार, शेतकरी, मध्यमवर्गीय लोक इ. सारे स्त्री पुरूष नागरिक स्वयंस्फूर्त प्रतिकाराला बाहेर पडले. 'करेंगे या मरेंगे !' या गांधीजींच्या घोषणेचा इशारा त्यांनी आमलात आणला. तुरुंगात येणाऱ्या कार्यकर्त्यांकडून बाहेरील चळवळीच्या स्फूर्तीदायक बातम्या हजारीबाग जेलमध्ये जयप्रकाशजींच्या कानावर आल्या. ते अस्वस्थ झाले.

या सत्याग्रहाचा ब्रिटीश राज्यकर्त्यावर जरी परिणाम झाला नसला तरी त्यांचे दोस्त जे चीन व अमेरिका यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या संदर्भात इंग्रज राज्यकर्त्यांवर दडपण

आणण्याचा प्रयत्न केला. १९४२ साली त्यावेळचे चिनचे राष्ट्राध्यक्ष चँग-के-शेक भारतात आले होते. त्यांनी उघडपणे भारतीय स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. काही समाजवादी व काही गांधीवादी पुढारी बाहेर राहीले होते. पोलीसांची नजर चुकवून ते बाहेर राहीले. अच्युत पटवर्ध, डॉ. लोहिया, एस्.एम्. जोशी, मोहनलाल गौतम वगैरे समाजवादी नेते अरूणा असफअली, सुचेता कृपलानी महिला नेत्या इत्यादि नेते भूमिगत झाले. त्यांनी एक कृती समिती स्थापन केली. गांधीजींचा 'करेंगे या मरेंगे' हा आदेश होता. शहरातल्या नागरिकांना व कामगारांना असहकाराचा आदेश दिला. अनेक प्रकारे हरताळे, बंद, केंद्रे नाहीसी करणे मोघारी शहराशी बाहेरच्या जगाचे दळणवळण चौदा दिवस नष्ट झाले होते.

या काळात ब्रिटीशांनी जुलूम जबरदस्तीचा कहर केला. शहराशहरातून कर्फ्यु पुकारला, गोळीबार केला. इंग्रजांच्या गोळीबारात ९ ऑगस्टनंतर पहिल्या दोन महिन्यात कितीतरी अज्ञात तरूण स्वातंत्र्याच्या वेलीवर बळी पडले. मुंबई अमदाबात, जमशेटपूर, कोईमतूर, सोलापूर या सर्व शहरातले रस्ते संपावरील कामगारांनी भरून गेले. शेतकऱ्यांचे मोर्चे नेऊन तालुक्याच्या कचेऱ्यावर राष्ट्रध्वज लावण्याचा कार्यक्रम सुरु केला. बागलपूर मिदनापूर, मोघीर, मुझफरपूर वगैरे जिल्ह्यात दहा हजार शेतकऱ्यांचे मोर्चे आले. बालीयाचा कलेक्टर पननास हजार जमावाच्या शेतकरी मोर्च्याला शरण आला होता. हा उठाव स्वयंपूर्ण होता. पण ब्रिटीशांनी स्त्रियांवर अत्याचार, बलात्कार, लहान बालकावर अत्याचार करण्यास सुरुवात केली.

बाहेर क्रांतीचा वणवा पेटला असताना मी तुरुंगातच सडत पडून राहू काय ? नाही. नाही... मला तुरुंग फोडून बाहेर पडलेच पाहिजे ! असा जे.पीं च्या मनाचा निर्धार पक्का झाला आणि बेचाळीसच्या क्रांतीतील ती साहसपूर्ण रोमहर्षक घटना घडली.

तुरुंगातून बाहेर पडून जाण्याची योजना गुप्तपणे काळजीपूर्वक आखण्यात आली. योजनेची सुत्रे बिहारचे शूर नेते योंगेंद्र शुक्ल यांचेवर सोपविण्यात आली. बरोबरीस सुजरनारायण सिंह, गुलाली, रामनंदन मिश्र, शालीग्राम सिंह आणि जयप्रकाश नारायण.

नोव्हेंबर महिन्यातील कडक थंडीचे दिवस होते. दिवाळीचा सण होता. सुरुंगात दिवाळीचा सण उत्साहाने साजरा करण्याचे ठरविण्यात आले होते. सजावट करण्यात आली. नाचगाण्यांचा कार्यक्रम ठेवला. पक्वान्नाचे भोजन बनविण्याची तयारीर झाली. पत्त्याचे खेळ, बँडमिंटनची मॅच व्हायची ठरली. बेचाळीस दिवे घेऊन मिरवणूक काढण्याचे ठरले. तुरुंगातून पळून जावयाचे तर रात्रीची वेळ गाठणे जरूर होते. म्हणून दिवाळीच्या निमित्ताने त्या दिवशी उशीरा बंदी करण्याचा डाव रचण्यात आला. त्या दिवशी कडक थंडो होती. जयप्रकाशजींना सायटीकचा त्रास होत होता. तरीदेखील पुन्हा संधी मिळणार नाही म्हणून त्याच दिवशी प्रकृतीची पर्वा न करता तुरुंगातून निसटण्याचे ठरविण्यात आले.

संध्याकाळ झाली होती. रात्रीचा अंधार दाटला. अचानक एका मोठ्या पुढाऱ्याच्या पोटात कळा सुरु झाल्या. डॉक्टर आणण्यासाठी अधिकाऱ्यांची धावपळ चालू झाली. तिकडे दिवाळभची धांदल चालू होती. तेवढ्यात सामसुमीचा फायदा घेऊन हे सहाजण भिंतीजवळ पोहोचले. एका पिशवीत कपडे थोडे खाण्याचे पदार्थ व पैसे बरोबर घेतले होते. भिंतीजवळ पोहचल्यावर धोतराला धोतर बांधून लांबलचक दोर तयार करण्यात आला. त्या दोराच्या सहाय्याने फक्त सहा मिनिटात सहाजन भिंतीवरून बाहेर पडले. गडबडीत कपड्यांची पिशवी भिंतीच्या आतच पडून राहिली.

## २.८ हजारीबाग जेलमधून पलायन :

हजारीबाग सेंट्रल जेल होता. हा जेल कोणत्याही स्टेशनपासून पन्नास मैल दूर पेक्षा जास्त होता. जंगल व डोंगरामध्ये हा जेल बांधला होता. रस्त्यामध्ये जेथे जेथे गाव होते तिथे आदिवाशी राहात होते. हजारीबाग जेल शहरामध्ये आहे. परंतु शहरापासून दोन तीन मैलावर आहे. शहरापासून दूर एक चट्टानावर हा जेल बनवला होता. मोठे मोठे दगड, लाकडे कापून त्यांना सिमेंटमध्ये जोडून उंच उंच भिंती उभा केल्या होत्या. भिंतींना चारही बाजूंना बुर्जीया केली होती. त्यामुळे रात्री ज्यावेळी प्रकाश टाकला जात होता. त्यावेळी सारा जेल

दिसत होता. बुरुजावर बंदुकधारी शिपाई पहारा देत होते. यामध्ये कोणाचीही हिंमत होत नव्हती की जेलमधून बाहेर पळून जाण्याची किंवा तशी कल्पना करण्याची.

आत जेलमध्ये तीन प्रमुख भाग होते. एका बाजूला दवाखाना, दुसऱ्या बाजूस छोकरा कित्ता जनान भाग हाजती भाग असे भाग होते. याच्या मध्यभागी जेलचे प्रमुख अंग होते. याच्या मधोमध जेलचे सेंट्रल टॉवर होते. हा टॉवर केंद्र मानल्यानंतर त्यांच्या अर्ध्या भागाला सहा वार्ड आहेत. त्याला बाबू वार्ड म्हणतात. एक चौथाई वृत्तमध्ये तीन वार्ड होते. ज्याला 'पंजाबी सेल' म्हणत होते. आणि एक लांबलचक दुमजली घर होते. ते साधारण कैद्यांचे वार्ड होते. या जेलची स्थापना जर्मन युद्धाच्या वेळी झाली. याचवेळी इंग्रजी सरकारने याला राजनैतिक रुप दिले. हा जेल बनवण्याचे कारण म्हणजे कोणत्याना कोणत्या कारणाने काळ्या पाण्याची शिक्षा दिली जात नव्हती. त्यावेळी त्यांना त्याच प्रकारे शिक्षा देण्यासाठी या जेलमध्ये ठेवण्यात येत होते. कारण दूरपर्यंत समुद्र, दूरपर्यंत जंगल व डोंगर, सुरक्षा यामुळे कोणीही हा जेल पार करू शकत नव्हता. आणि तेथील गावामधील लोकात कैदी मिळत नव्हते. कारण हे आदिवाशी अर्धनग्न जंगली लोक होते. त्यामुळे कोणी पळून जाणे शक्य नव्हते.

जयप्रकाशांना देवळी मधून हजारीबाग जेलमध्ये ज्या ठिकाणी त्यांना ठेवण्यात आले होते त्याला 'छोकरा किता' म्हणत असत. ज्या खोलीमध्ये अब्दुल गफार खॉ राहत होते. त्या खोलीमध्ये जयप्रकाश राहत होते. जयप्रकाशजींची तब्येत खराब होत होती. त्यांना साईठिकचा त्रास होत होता. तरीसुध्दा पळून जाण्याचा बेत घातला. यामध्ये जयप्रकाश, सुरजनारायण, मुखर्जी, येगेंद्र शुक्ल, रामानंद इत्यादीने तो बेत पार केला.

धोतराच्या साहय्याने सहा मिनिटात सहाजनांनी भिंत पार केली. बाहेर सर्वत्र जंगल आणि अंधार, पण क्षणाचाही वेळ न घालवता शाळीग्रामने दाखवलेल्या रस्त्याने पळावयास सुरूवात केली.

सकाळ झाली जेलचे नविन सुपरिटेंडेनं साहेब आले. जेलमध्ये सफाईसाठी एक व्यक्ती जात होती. त्याने मुखर्जीने ठेवलेले त्यांचे व जयप्रकाशजींचे भांडे व ताट घाण करून ठेवले होते. त्यामुळे त्या सफाईवाल्या माणसाला शंका आली नाही की ते पळून गेलेत. परंतु दुपारी पहिल्या जेलचे अधिक्षक कर्नल नाथ यांना जयप्रकाश यांच्या संबंधी सरकारी आदेश मिळाला. आणि त्यांना आपल्या कार्यालयामध्ये बोलवले. त्यावेळी जयप्रकाश कोठेच मिळाले नाहीत. त्यावेळी जेलची घंटा वाजवण्यात आली. कर्नल नाथ यांने बराच हुडकण्याचा प्रयत्न केला पण सापडले नाहीत त्यामुळे बिहार गव्हर्नर ने नाथ यांना पदच्यूत केले. नाथ ने जिल्हा कमिशनर के.एस.वी.रमन यांना सूचना दिली. रमनने सांगितले जास्तीत जास्त शिपाई लावून जंगलामध्ये लावून द्या. त्याचबरोबर जेलमध्ये योगेंद्र शुक्लांना बोलवायला सांगितले ते ही जाग्यावर नाहीत. सुरजनारायण ही जाग्यावर नाहीत. जेलच्या सा-या अधिका-यांचे धाबे दणाणले. रजिस्टर मधील नोदीप्रमाणे तपासणे केली. जयप्रकाशसहीत सहा कैदी बेपत्ता झाले होते.

रात्रभर मिळालेल्या अंधाराचा आणि वेळेचा फायदा घेवून सहज धावले. कधी छातीन सरपटत गेले तर कधी हातावर अन गुडघ्यावर जनावाराप्रमाणे रांगत गेले. अंधारात एके ठिकाणी सहाजणही एका पाण्याच्या ओढयात पडले . अंगावरचे सगळे कपडे भिजून गेले. पळायच्या गडबडीत कपडयांचे गाढोडे तुरूंगात विसरून आले होते. अंगाला चिखल लागला. कडाक्याची थंडीत भिजलेले कपडे अंगावर यामुळे सर्वजण काकडू लागले. दातावर दात आपटू लागले. पण पुढे चालत राहिले. सेंट्रल टॉवर वरून फेकला जाणारा प्रकाश झोत चुकवून लपत-छपत चालले. मधेच जंगली वाघांचे गुरगुरने ऐकू येत होते. आता काही धडगत नाही असे वाटले पण सुटले. थोडे पुढे जाऊन सिगरेट ओढणा-या रामनंदन मिश्रांकडे काडयाची पेटी ओढून एका बाजूला शेकोटी केली. हातपाय शेकून घेतले. कपडेही वाळवले. आग विझवली अन् पुढे चालू लागले. पेंग येत होती. थोडी विश्रांती घेऊन पुन्हा पदयात्रा सुरू झाली.

सकाळ झाली सूर्य वर आला सर्वांना भुक लागली होती. उंबरे, करवंदे फस्त केली. संबंध दिवसभर चालत होते. रामानंदच्या खिशात एक शंभराची नोट होती. पण मोड कशी मिळणार ? योगेंद्र शुक्लाच्या खिशात एक पावली सापडली. शेजारच्या खेडयात जाऊन एक पुडा आणला भुक थोडी शमली. जे.पी. ना साईठिकाचा त्रास होवू लागला शाळीग्राम आणि योगेंद्र आळीपाळीने जे.पी. ना खाद्यांवर घेवून चालू लागले.

दुपार टळून संध्याकाळ झाली. सर्वजण चालतच होते कुठंतरी थांबाव तर सुरक्षित जागा नाही. अखेरीस रस्त्यावरून चाललेली एक बैलगाडी दिसली. सर्वांना आनंद झाला. गाडीवानाला सर्वांनी विनंती केली. गाडीभाडे म्हणून १०० रूपयाची नोट आणि घडयाळ देण्याचा करार केला. पण या सर्वांना दरोडखोर समजून गाडीवान गाडी टाकून पळून गेला.

रात्री एक वाजेपर्यंत वाटचाल केल्यावर एके ठिकाणी सर्वजण थांबले. शेकोटी करून शेकत बसले. थोडी विश्रांती घेवून पुन्हा चालू लागले. दुस-या दिवशी शाळीग्राम सिहांच्या ओळखीचे एक गांव आले. एका झाडाच्या आडोशाला जयप्रकाश व दोघा साथीदारांना थांबवले. इतर दोघांना घेवून शाळीग्राम गावात शिरले. दुबेजी वाटेतच भेटले. त्यांनी हे सर्वजण तुरूंगातून पळून गेल्याची बातमी देशभर पसरल्याचे सांगितले. गावात न येण्याची सूचना दिली. गावाबाहेरच खाण्यापाण्याची व्यवस्था केली १०० रूपयाची नोट देवून मोड आणली. खेडूतांचे कपडे विकत घेतले. सहाही जणांना पस्तीस तासानंतर पोटभर जेवण मिळाले.

दुबेजींनी जयप्रकाशांसाठी आपल्या धाकटया भावाला बैलगाडी देवून पाठवले. तिघेजण गाडीत पडून राहिले तिघंजण खांद्यावर कु-हाडी टाकून शेतक-याप्रमाणे गाडीमागून चालू लागले. गया जिल्ह्याच्या सिमेवर दुबेजींची गाडी परत पाठवून दिली. बोधगचे जवळ शाळीग्रामची सासुरवाडी होती. तेथे लोकांनी केसाचे मुंडन केले. किसानांचे वेष धारण केले. एक विशेष बैलगाडी तयार केली. त्यात धान्याची पोती भरून या पोत्याच्या आड बसून हे शेतकरी वेषातून गया शहरातून पार झाले. पुढे गेल्यावर हमरस्त्याने न जाता

कालव्याच्या काढाने सात मैल प्रवास करून सोननदी पार केली. कारण शोण नदीच्या पुलावर पहारा होता.

ग्रामीण वेषामध्ये जयप्रकाश एखाद्या तगड्या भोजपुरी खेडुतासारखे दिसत होते. डोके साफ मुंडन केलेले, लांब मिशा, जाडाभरडा कुर्ता, गुडघ्यापर्यंत धोतर, पायात चमचौधी जोडे आणि हातात एक लाठी असा त्यांचा अवतार होता. जोडीदार दोघेजणही अस्सल खेडूतच वाटत होते. दोन तुकड्या तयार केल्या. एक तुकडी सुरजनारायण यांच्या नेतृत्वाखाली गंगापार करून उत्तर बिहारमध्ये गेली. तर दुसरी तुकडी जयप्रकाश, रामानंद व शाळीग्राम अशी येथे ते जाऊ लागले. रात्र एका देवळात काढली. मंदिरातल्या बाबाजींनी प्रसाद दिला. सकाळी करवंदिया स्टेशन गाढले. तिघेजण रेल्वेच्या थर्डक्लासमध्ये डब्यामध्ये घुसले. मोगलसराय जंक्शनवर उतरले. वर्तमानपत्र पाहिले. जयप्रकाशांना पकडण्यासाठी सरकारने दहा हजाराचे बक्षीस लावले होते. यापुढे सावधगिरी बाळगणे आवश्यक होते. शाळीग्रामला पुढे पाठवून दिले. जयप्रकाश व रामनंदन एक्का करून रामनगरला गेले. तेथून तिघेजण वेगवेगळ्या नावेतून गंगा पार करून नगवा येथे काशी विश्वविद्यालयात उतरले. एका मित्राच्या घरी रात्री जयप्रकाश गेले आणि सुटकेचा नि:श्वास सोडला. अशारितीने तुरुंगातून पळून जाऊन जयप्रकाश एकदाचे बनारसला येवून पोहोचले. थोडी विश्रांती घेतली आणि क्रांतीकार्याला लगेच सुरुवात केली.

बनारस मधील सहकार्यांच्या साहाय्याने उत्तर प्रदेशमधील भूमीगत कार्यकर्त्यांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. 'बनारस' हे भूमीगत कार्याचे एक मोठे केंद्र होते. गांधीजींचा करेंगे या मरेंगे हा आदेश सार्थ बनवण्याच्या दृष्टीने जयप्रकाशजींची धावपळ सुरु केली. जनतेची प्रभावी आणि बलवान संघटना करून प्रतिसत्ता स्थापन करण्याचा व ती टिकविण्याचा प्रत्यक्ष कार्यक्रम दिला पाहिजे असे मत जयप्रकाशजींनी प्रगट केले. वेगवेगळ्या प्रकारे दडपशाहीपुढे विस्कळीत होऊ लागलेल्या व पिछेहाटीमुळे निराश बनत

चाललेल्या भूमीगत चळवळीना नवीन प्राण ओतून त्यांनी स्वातंत्र्य सैनिकाचे नितीधैर्य टिकवून धरले होते.

जयप्रकाशजी तुरुंग फोडून आल्यावर थोड्याच दिवसात देशभर अन्नटंचाई वाढू लागली. वाढती महागाई व टंचाई यामुळे जनतेतला असंतोष वाढेल आणि मार्च, १९४२ च्या सुमारास व्यापक उठाव होईल अशी कल्पना होती. बंगालमध्ये दुष्काळांची चिन्हे दिसत होती. तेंव्हा या काळात गनिमी दले तयार करून सरकारला हैराण करावे व जन उठावाचे कार्य सुकर करावे अशी योजना होती. याच सुमारास हिंन्दुस्थानभर मोडतोडीची चळवळ फार मोठ्या प्रमाणात झाली. महाराष्ट्रात कटाचा खटला, लाहोर केस, पेशावर केस, कर्नाटकातील, उत्तर हिंदुस्थानातील अनेक खटले हे सर्व स्वातंत्र्य सैनिकाच्या लढाऊ वृत्तीचे द्योतकच होते. त्यांच्या प्रतिकाराची भावना जिवंत ठेवण्यासाठी बारीकसारीक चकमकी चालू ठेवण्याची जरूरी आहे.

या दृष्टीने जयप्रकाशर्जीनी प्रयत्न केला. जनतेमध्ये उत्साहाची लाट उसळली. जयप्रकाश तरूणपिढीच्या गळ्यातले ताईत बनले. साहसामुळे एक प्रकारचे वलय जयप्रकाशांच्या व्यक्तिमत्वाभोवती निर्माण झाले. रामानंदला त्यांनी मुंबईला पाठवले. तेथे अच्युतराव पटवर्धन, अरूणा असफअली, राममनोहर लोहीया, केसकर दिवाकर एस्.म्. जोशी, सोने गुरुजी इ. भूमीगत नेत्याशी संपर्क स्थापित केला. क्रांतीच्या संघटनेची योजना जे.पीं. नी आखली. सरकारी दडपशाहीमुळे क्रांती दुबळ्यासारखी परिस्थिती निर्माग झाली होती. जयप्रकाशर्जीनी घोषणा केली. ''क्रांती दबलेली नाही लढाईत जयापराजय असतो. भावी चढाईसाठी तात्कालिक माघार घ्यावी लागते. ब्रिटीश सत्ता उखडून टाकण्यासाठी पुन्हा चढाई करायची आहे.''[२३]

देशभरातल्या क्रांतिकार्यामुळे नवे चैत्यन्य निर्माण झाले. सरकारी खजीने लुटले जाऊ लागले. रेल्वे रुळ उखडण्यात आले. पोस्ट ऑफीसे जाळण्यात आली. बिहारमध्ये 'आझाद दस्ते' नावाचे संघटन केले. त्यात त्यांना अनुभव ४२ च्या क्रांती लढ्यातील मोठी

रोमांचकारी घटना घडली. आझाद दस्त्यासाठी हिंदुस्थान आणि नेपाळच्या सरहद्दीवर बद्रोकाटापू नावाच्या कोसी नदीच्या किनाऱ्यावरील एका ठिकाणाची जयप्रकाशजींनी निवड केली. प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी २० आझाद दस्ते संघटीत करावे अशाप्रकारे कल्पना होती. सर्वात प्रथम बिहारमध्ये ही संघटना सुरु करावी म्हणून सुरजनारायण यांना संयोजक नेमण्यात आले. कोसीच्या किनाऱ्यावरील या रणक्षेत्रात डॉ. राम मनोहर लोहीया यांनो येऊन मिळाले. बिहार बंगालमधील अनेक क्रांतिकारक फरारी लोकांची तेथे ये-जा सुरु झाली. जयप्रकाशजींच्या निवासाजवळ एक टेकडी होती. त्या टेकडीवरून हिंदुस्थानची आकाशवाणी डॉ. राम मनोहर लोहियांच्या तोंडाने बोलू लागली. गुप्त रेडिओचा प्रचार आणि आझाद दस्त्याचे संघटन असे दुहेरी काम त्या ठिकाणी सुरु झाले.

आझाद दस्त्याचे काम व शिक्षण देण्यासाठी तीन शिक्षण शिबीरे बिहारमध्ये सुरु करावी असे ठरले. पहिल्या शिबिरात मुख्य शिक्षक म्हणून काम करणारा क्रांतिवीर नित्यानंद पुढे भागलपूर जिल्ह्यात सानवरसा या गावी पोलीसांशी लढत असताना गोळीला बळी पडून शहीद झाला. नेपाळच्या हद्दीत गोळ्या चालवण्याचे शिक्षण काम चालू होते. शिबीर काही दिवस चालल्यावर भारत सरकारतर्फे प्रयत्न सुरु झाले की नेपाळ सरकारवर दबाव आणून या लोकांना पकडून द्यावे असा भारतात प्रयत्न झाला. जयप्रकाशजी, लोहिया, शामानंदन वगैरे पाच-सहा मंडळींना हनुमाननगर पोलीस ठाण्यात यांच्या हद्दीत पकडण्यात आले. पण हे लोक कोण आहेत यांना माहित नव्हते. त्यामुळे पोलीसांना शामनंदनने खोटे सांगून की जयप्रकाश एका खानदानी घराण्यातील आहेत. सितामढीच्या ठाणेदाराचा दोस्त असल्यामुळे त्यांना खोट्या खटल्यात फसविण्याचा त्यांचा डाव आहे. त्यांचे वडील नुकतेच वारले. म्हातारी आई एकटीच घरी आहे. पत्नी वाट बघत असेल अशी बतावणी केली. ही बातमी त्यांना खरी वाटली. त्यामुळे फक्त जबाब घेऊन त्यांना सोडून देण्याचे कबूल केले.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे प्रातर्विधीसाठी बाहेर पडल्यानंतर नदीच्या किनाऱ्याला जयप्रकाशजींना शिबीरातील एक मनुष्य भेटला. आपण कोणत्या परिस्थितीत अडकून आहे.

UNIVERSITY LIBRARY HAPUR

हे सुरजीत नारायण सिंगाना निरोप दिला. सकाळी आठ वाजता ठाणेदार ऐकेकाचे जबाब घेवू लागले. तेवढ्यात आझाद दरस्त्याच्या पस्तीस स्वयसेवकांनी ठाण्यावर हल्ला करून जयप्रकाश आणि लोहिया यांना सोडवून आणले. या झटापटीत लोहियांच्या पायाला लहानशी जखमही झाली. त्यामुळे जाताना ते मऊ गवतावर जाऊ लागले. तेव्हा जयप्रकाशांनी त्यांची चेष्टा केली. "राम मनोहर, गरम वाळूवरून चाल, त्या गरम वाळुमुळे तुझा पाय चांगला शेकून निघेल व जखमेला आराम पडेल." लोहियांनी चेष्टेनेच लगेच उत्तर दिले. "जे.पीं. तू तर चुकून क्रांतिकारक झालास. तू तर कवीच व्हायला पाहिजे होतास."[२४]

ब्रिटीश राजसत्ता खिळखिळी करणे हा सॅबोटाज विध्वंसाच्या कार्यक्रमाचा उद्देश होता. बिहारमध्ये बालीया विभागात तीन महिने स्वतंत्र सरकार स्थापन केले. महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली प्रतिसरकारे खेडोपाडी स्थापन झाली होती. पाटणा सचिवालयावर तिरंगी झेंडा उभारण्यासाठी सात विद्यार्थी गोळीबारात हुतात्म्ये झाले. दिल्लीहून मुंबईस आले. मुंबईत तीन महिने राहिले. तेथील प्रसिद्ध 'मूषक महालात' त्यांची साने गुरुजींशी भेट झाली. गुरुजींनी स्वयंपाक करून वाढला. मद्रास कलकत्ता येथे गुप्त अड्डे तयार केले. सरकार चीडीला पडले. जयप्रकाशांना पकडण्यासाठी सरकारने एकतीस हजाराचे बक्षीस जाहीर केले होते. कोणीतरी पकडून देईल म्हणून ज्यप्रकाश नेपाळमध्ये गेले होते.

नेपाळच्या झटापटीतून सुटून जयप्रकाश पार्वतीपूर, दिनाजपूर या मार्गाने रेल्वेचा प्रवास करत कलकत्त्याला आले. त्या ठिकाणी सुभाष बाबूंनी आझाद हिंद फौज स्थापन केल्याची व ती फौज ब्रह्मदेशाच्या रस्त्याने हिंदुस्थानकडे कूच करीत असल्याची वार्ता कळली. त्या सैन्याशी संपर्क साधण्यासाठी त्यांनी एक आपला मनुष्य आसामच्या रस्त्याने ब्रह्मदेशाकडे पाठविला होता. लवकरच भयंकर पावसाळा सुरु झाल्यामुळे त्यांना संपर्क साधता आला नाही. स्वातंत्र्य सैनिकाच्या नात्याने जयप्रकाशजींनी जे पत्र प्रसिद्ध केले त्यात

सुभाषबाबूंच्या या प्रयत्नाचा पुढीलप्रमाणे उल्लेख आहे. "आपणास कदाचित माहीत असेल की सुभाषबाबूनी एक अस्थायी स्वतंत्र भारतीय सरकार स्थापन केले असून या सरकारला जपानने मान्यताही दिली आहे. त्यांनी आझाद हिंद सेना नावाची एक सेना संघटीत केली असून त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या घटना आपल्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. सुभाष बाबूंना देशद्रोही म्हणणारे काही लोक आहेत. पण हे लोक स्वत:च देशद्रोही आहेत. राष्ट्रीय भारतात सुभाष बाबूंना एक ज्वलंत देशभक्त म्हणून ओळखले जाते. आणि ते स्वातंत्र्य सैनिकांच्या पहिल्या रांगेत हमेशा राहिले आहेत. त्यांच्यासारखा नेता आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा सौदा करील याची स्वप्नातही कल्पना करता येत नाही."[२५]

मानवी जीवीत हानी टाळून सरकारी मालमत्तेचे विध्वंस करण्याचे कार्यक्रम पार पाडण्यात आले. पटसनच्या एका व्यापारी वेठने त्यांना गैर कानूनी प्रेस मार्फत ब्रिटीश विरोधी प्रचार करण्यासाठी व प्रचार साधन छापण्यासाठी रुपये देण्यात आले होते. डिसेंबरच्या सुरुमध्ये त्यांनी 'स्वतंत्रता संग्राम मोर्चा' या शीर्षकाखाली एक पुस्तिका छापून या सर्व घटनांचे सिंहावलोकन केले.

आझाद दस्त्यावर आलेल्या संकटातून जयप्रकाश मोकळे होऊन भुमिजनांची व्यापक संघटना करण्याचे काम हाती न घेता महात्मा गांधींच्या उपोषणाची हकिकत त्यांच्या कानावर येऊन थडकली. गांधीजींचा अंत होतो की काय अशी गांधीजींची प्रकृती क्षीण झाली होती. गांधीजींनी उपोषण चालू करण्यापूर्वी सरकारला एक पत्र पाठविले होते की जयप्रकाश यांचे पकडण्याचे प्रयोजन काय त्याच्या पकडीसाठी बक्षीस लावण्याची जरूरी काय होती. त्यांना जिवंत पकडा किंवा गोळी मारण्याचा आदेश का देण्यात आला होता. या उपोषणामुळे जयप्रकाशजींचे सहकारी चिंतामग्न झाले. सर्वांच्या सुदैवाने गांधीजी या एकवीस दिवसाच्या अग्नीदिव्यातून बाहेर पडले व जयप्रकाशजींनी आपले काम चालू ठेवण्यास मन:शांती मिळाली.

भूमिगत अवस्थेत झालेली धावपळ व मनावरचा ताबा भयंकर ताण यामुळे जयप्रकाश यांची प्रकृती देखील खालावली होती. काहीमित्रानी त्यांना दुसऱ्या देशात जाऊन विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. पण हजारो लोक हातावर शीर ठेवून लढत असताना आपण बाहेर जाणे त्यांना पसंद नव्हते. बंगालमध्ये भयानक दुष्काळ पडून लक्षावधी देशबांधव भुकेला बळी पडत असताना त्यांनी बंगालमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. पण तिथे मलेरियाने आजारी पडल्यामुळे दिल्लीला काही दिवस विश्रांती घेऊन त्यांनी पंजाब व सरहद्द प्रांताला भेट देण्याचे ठरविले. पंजाबमध्ये अपेक्षेप्रमाणे उठाव झाला नव्हता. हीच गोष्ट त्यांच्या मनाला लागून राहिली व ती दिल्ली येथे पंजाबच्या कार्यकर्त्यांची बैठक घेतली व ती आटोपून फंटीयर मेलने सरहद्द प्रांतातल्या स्वातंत्र्यसैनिकांना भेटण्यासाठी ते रवाना झाले. पण पंजाबच्या या प्रकरणात कोणी देशद्रोही खबऱ्या निघाला व त्याने जयप्रकाशजींच्या हालचालीचा सुगावा पोलिसांना दिला. १९ सप्टेंबर, १९४३ रोजी सकाळी अमृतसर स्टेशनवर पकडले होते. सुटबूट घालून साहेबी वेषात फर्स्टक्लासमधून रेल्वेप्रवास करणाऱ्या जयप्रकाशांना लाहोरला पोहोचण्यापूर्वीच पकडले.

अमृतसर स्टेशनवर जयप्रकाशजी चहानाष्टा करून आपल्या डब्यात जाऊन बसले. तेंव्हा इंग्रज पोलीस अधिकारी दोन हिंदी अधिकाऱ्यासह त्यांच्या कपार्टमेंटमध्ये आले व पिस्तुल रोखून जयप्रकाशजींना भटकलेले अटकावले. आपण मुंबईचे व्यापारी आहोत नाव एच्.पी. मेहता आहे असे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आपण व्यापारानिमित्त रावळपिंडीला चाललो आहोत हे ही सांगितले. पण खबर पक्की असल्यामुळे त्यांचे कांही चालले नाही. ९ नोव्हेंबर, १९४२ दिवाळीच्या रात्री हजारीबाग तुरुगातून बाहेर पडलेला हा सिंह १८ सप्टेंबर, १९४३ रोजी पुन्हा परकिय सरकारच्या जाळ्यात सापडला. गाडी लाहोरच्या अलीकडे मुघलपुरा नावाच्या एका लहानशा स्टेशनात थांबविण्यात आली. सगळ्या स्टेशनला पोलीसांचा गराडा होता. तेथे जयप्रकाशांना उतरविण्यात येऊन कडक पोलीस पहाऱ्यात लाहोरच्या तुरुंगात नेऊन डांबण्यात आले. लाहोरचा किल्ला राजकिय

कैद्यांच्या छळवादाबद्दल प्रसिद्ध होता. हजारीबाग तुरुंगातून पळाल्यापासून बरोबर दहा दिवसांनी व दहा महिन्यांनी त्यांची लाहोरच्या एकांतवासात रवानगी करण्यात आली.

## २.९ लाहोरच्या तुरुंगात :

लाहोरच्या तुरुंगात असताना जयप्रकाशांना केवळ ५२ पानाची वही देण्यात आली. त्या वहीत वेळोवेळी केलेली टिपने व मित्र श्री. मिनू मसानी त्यांच्याशी झालेला पत्रव्यवहार यावरून बंदीवासात काय यातना भोगाव्या लागल्या त्यांच्या विचारात काय बदल होत गेले याची कल्पना येते.

लाहोरच्या तुरुंगात फक्त ट्रिब्यून व स्टेटस्मन ही दोन पत्रके व ती ही काटछाट करून वाचावयास मिळत. लाहोर किल्ल्यात त्यांना एका अंधाऱ्या कोठडीमध्ये एकट्याला ठेवण्यात आले होते. रोज सकाळी एक तास संध्याकाळी एक तास त्यांच्या हातात हातकड्या घालून पोलीसांच्या पाहाऱ्यात त्यांना मोकळ्या हवेत व्यायामासाठी बाहेर आणले जात असे. एक महिना गेल्यावर निरनिराळ्या प्रांतातून माहिती गोळा केल्यावर बंगाल, बिहार, पंजाबमधील सी.आय.डी. अधिकाऱ्यांची जे.पी.च्यावर चौकशी कामे सुरु होती.

जयप्रकाशजींनी स्पष्टपणे सांगितले की भूमिगत चळवळीविषयी मी काहीही सांगणार नाही. प्राण गेला तरी चालेल. जयप्रकाशांना प्रत्यक्ष मारहाण झाली नाही पण शारीरिक व मानसिक यातना देण्यात आल्या. तासनतास खाण्यास न देता किंवा झोपूही न देता उभे ठेवून त्यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती करण्यात येई. जयप्रकाशजींना कशा यातना सोसाव्या लागल्या ते पुढील उताऱ्यावरून कळून येईल. "१८ सप्टेंबर, १९४३ रोजी अमृतसर येथै अटक करण्यात आली. त्या दिवसापासून मला किल्ल्यात ठेवण्यात आले. पकडल्यानंतर सी.आय.डी. चौकशी करण्यात आली. सकाळी आठ वाजल्यापासून ते मध्यरात्र उलटून जाईपर्यंत माझी चौकशी चालत असे. अनेक प्रकारच्या धमक्या देण्यात येत होत्या. झोपू दिले जात नव्हते."

जयप्रकाशांना पकडल्यानंतर आणखी आठ महिने लोहिया भूमिगत होते. १९४४ ला त्याना मुंबईला पकडण्यात आले. एक महिन्यानंतर त्यांना लाहोरला आणले. जयप्रकाशप्रमाणे त्यांनाही यातना देण्यात आल्या. लाहोरच्या तुरुंगात असताना प्रो. हेरॉल लाष्की यांना लिहिलेल्या पत्रावरून त्यांना दिलेल्या क्षमा यातनांची कल्पना येते. ''चार महिने सतत छळवणूक करण्यात आली. रात्रंदिवस जागे ठेवण्यात आले. सलग दहा दिवस एका क्षणाचीही झोप दिली नाही. अशा अवस्थैत उभे राहण्यास नाकारल्यावर मला उभे करण्यासाठी त्यांनी हातकड्या घातलेल्या माझ्या हातावर मला जमिनीवर टाकून गरगरा फिरवले.''

जयप्रकाश यांच्यावर यातनाकांड चालू आहे याची बातमी बाहेर येत होती. त्यांच्या विरूद्ध पंजाबमधले कायदे पंडीत श्री. जीवनलाल कपूर यांचा संपर्क साधून मुंबईचे प्रसिद्ध वकील पारडीवाला यांनी हाबिअस कॉर्पस्चा अर्ज लाहोर हायकोर्टात दाखल करण्यात आला. पण पंजाब पोलीसांनी 'पारडीवाला' यांनाही अटक केली. कारण पारडीलांनीसुद्धा 'हेबीअसकार्पसचा' अर्ज केला होता. जयप्रकाश यांना 'सेक्यूरिटी प्रिजनर' हा खटला बदलून त्यांच्यावर १९ व १८ 'रेगुलेशन' चे राज्य प्रिजनर केले. कारण हेबीअस कॉर्पसचा अर्ज लागू शकणार नाही. त्यानंतर हेबीअस कॉर्पस अमान्य केल्यानंतर परत त्यांना 'सेक्युरिटी प्रिजनर' कायदा बनविण्यात आला व त्यांना त्यांच्या खाली अटक केल्याचे दाखवले.[२६] श्री मसानी यांनी पंजाबचे त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. खिजर हयातखान यांना पत्र पाठवून जयप्रकाश यांच्याबरोबर पत्रव्यवहार करण्याची व त्यांना वाचण्यासाठी पुस्तके पाठविण्याची परवानगी मिळविली. तेवढाच त्या यमयातनामध्ये विरंगुळा निर्माण झाला.

या यातनामुळे होणाऱ्या दु:खापेक्षा १९४२ चे ९ ऑगस्ट पासून जनतेने स्वयंस्फूर्तपणे सुरु केलेले प्रतिकाराचे आंदोलन हे 'आमचे कॉंग्रेसचे आंदोलन नव्हे' अशी विश्वामित्राची भूमिका कॉँग्रेसच्या काही कथील गांधीवादी नेत्यांनी जाहीरपणे मांडल्यामुळे जयप्रकाशांना मनस्वी दु:ख झाले. महात्मा गांधीजींच्या शिकवणीमुळेच आम्ही बेचाळीसच्या आंदोलनात

मानवी जीवीत हानी टाळण्याचा प्रयत्न केला. सरकारच्या दडपशाहीला स्वाभिमानाने दिलेले प्रतिउत्तर 'आमचे नव्हे' म्हणून पितृत्व नाकारणे ही विश्वामित्री भूमिका चीड आणणारी आहे आणि भारतीय जनतेचा तेजोभंग करणार आहे अशी भूमिका जयप्रकाशजींनी मांडली.

सोव्हियत रशियाबद्दल त्यांचा भ्रमनिरास झाला. पण तरीही हिटलरने कितीही चूका करून रशियावर हल्ला केल्यानंतर रशियाच्या कितीही चूका असल्या तरी तो जागतिक समाजवाद व कामगारवर्गाचा एक मजबूत किल्ला आहे. गांधीजींची सुटका ८ मे, १९४४ रोजी झाली. ८ मे रोजी गांधीजींच्या प्रकृतीविषयी लिहिताना म्हणतात की, त्यांनी ब्रिटीशांबरोबर कोणतीही तडजोड करू नये आजच्या परिस्थितीत अटीवर किंवा आपले तत्व सोडून तडजोड देशाचा फायदा करणार नाही असा अभिप्राय व्यक्त केला. जयप्रकाश स्वाभिमानाने मृदू असले तरी आयुष्यात कधीही तत्वाशी व स्वत:ला प्रतीत झालेल्या सत्याशी त्यांनी तडजोड केली नाही.

जे.पीं. वर सरकार खटला भरणार या वार्तेने देशभर खळबळ माजली. त्यांचा बचाव करण्यासाठी भारतातले तज्ञ कायदेपंडीत वकिलपत्रे घेण्यास तयार झाले. इतकेच नव्हे तर इंग्लंडमधील मजूर पक्षाने भारतात वकिल पाठविण्याचा निरोप कळविला. सर्व बाजूनी झालेल्या तयारीमुळे जे.पीं. वर खटला चालविण्याची योजना सोडून दिली.

बॅ. जिनाशी महात्मा गांधींनी वाटाघाटी सुरु केल्या. यासंबंधी जयप्रकाशांनी मोठे मार्मिक उद्‌गार काढले. त्यांच्या मते ''काँग्रेस व मुस्लीम लीग यांच्यातली तडजोड म्हणजे हिंदू व मुसलमान यांच्यातली तडजोड नसून राष्ट्रीय वृत्ती व जातीय वृत्ती यांतील तीतडजोड ठरेल.''[२७]

जयपक्राशजींना गांधीवादाकडे वळविण्याचा प्रयत्न मिनु मसानी यांनी केला. लाहोरच्या तुरुंगात असताना मसानी यांनी आपले 'समाजवादाचा फेरविचार' हे पुस्तक मुद्दाम त्यांना वाचावयास दिले. जयप्रकाश म्हणतात की, ''स्टालीनच्या रशियन राजवटीवर तू जी

टिका केली आहेत संदर्भात मात्र माझे १०० टक्के मतैक्य आहे. पण तू गांधी मताचा जो स्वीकार केला आहेस याबद्दल मात्र नाही." लाहोरच्या तुरुंगात असताना त्यांचा मार्क्सवादावरचा विश्वास उडत चालला होता. पण गांधीवाद अजून ज्यांनी स्वीकारला नव्हता.

जयप्रकाश आपल्या रोजनिशीत म्हणतात, "हिंसा म्हणजे मोठे पाप आहे असे दिसते. पण ती फक्त ब्रिटीशांच्या विरूद्ध वापरली तर, कारण आज स्वत: महात्मा गांधी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करीत आहेत. आणि या हुकुनावरून हजारो काँग्रेसजन अर्थात फक्त तरूणच खांद्यावर बंदुका घेऊन व तिरंगी झेंडे फडकावीत क्रुरकर्मा जपानी व पाशवी जर्मनांचे मुडदे पाडण्यास जातील. (तेव्हा हिंसा होणार नाही काय ?) गांधीजी हे एक भयंकर विरोध विकासवादी आहेत आणि ते त्यांचा युक्तीवाद कोणत्याही बुद्धिवान माणसाला समजून देतील यात शंका नाही. पण अडचण अशी आहे की, मी बुद्धिवान नाही."[२८]

१९४५ च्या सुरुवातीला जयप्रकाश व लोहिया यांना लाहोरच्या किल्ल्यातून आगरा कारागृहात पाठविण्यात आले. कारण लोहिया यांना वर्तमान अध्यक्ष प्रोफेसर लाष्कींना यांनी ऐतिहासिक पत्र लिहिले होते. त्यामध्ये आपण व जयप्रकाश निर्दोष आहोत याची नोंद केली होती. त्यानंतर या किल्ल्यामध्ये किती यातना भोगाव्या लागतात याचा उल्लेख केला होता. किल्ल्यामध्ये त्यांना आणल्यानंतर त्याचवेळी एक ब्रिटीश संसद सदस्यांचे शिष्टमंडळ भारतात आले. जयप्रकाश व लोहिया यांची भेट घेतली. या भेटीसंबंधी या शिष्टमंडळाचे एक प्रमूख श्री. रेनॉल्ड यांनी आठवण लिहून ठेवली आहे. त्यानुसार त्या शिष्टमंडळाचे लोक संध्याकाळचे सुमारास तुरुंगात दाखल झाले होते. "लोखंडाच्या लांबच लांब सळ्यांच्या उंच फाटकांची कुलपे किल्ल्यांच्या मोठ्या जुडग्याने खोलली. तो आवाज चमत्कारिक होता. पुष्कळ फाटके पार केल्यानंतर एका उंच भिंतीच्या छोट्याशा आवारात शिपायांच्या घेऱ्यामध्ये आमची व लोहिया यांच्याशी भेट झाली."[२९] यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण संभाषणे

झाली. त्यानंतर जयप्रकाश यांना सोडण्यात येणार अशी अफवा उठविण्यात आली. परंतुज्यावेळी कॅबिनेट मिशन भारतात येईल त्यावेळी. त्यांच्या सुटकेच्या अगोदर भारतीय सरकारचे 'होम मेंबर' जयप्रकाश यांच्या आगरा जेलमध्ये गेले. त्यांच्या समोर हिंसा व अहिंसाचे प्रश्न जयप्रकाश समोर उठविण्यात आले. त्यावेळी जे.पीं. नी स्पष्ट सांगितले की, ''हमरा कमसद आजादी है । अगर अहिंसा से मिली तो क्या कहते । तू जरूरत हुई तो हिंसा से भी उसे प्राप्त करने मे हम नही मुकरेंगे ।''[३०]

जयप्रकाशजींना अजून सोळा महिने त्यांना आगऱ्याच्या जेलमध्ये काढावयाचे होते. नासिक देवळी, हजारीबाग, लाहोर, आगरा, देशाच्या उत्तर दक्षीण पश्चिम व पूर्ण अशा चारही भारतातील भागातील कारागृहांत वास या महान देशभक्ताने घेतल्याशिवाय भारत स्वतंत्र व्हायचा नव्हता. शेवटी गांधीजींनी जेव्हा ब्रिटीश सरकारचे कॅबिनेट मिशन वाटाघाटीसाठी आले तेंव्हा अनुकूल वातावरण निर्मितीसाठी गांधींनी ज्या अटी सरकारपुढे ठेवल्या होत्या त्यामध्ये जे.पीं. व लोहिया यांच्या सुटकेची प्रमुख अट ठेवली.

दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांचा विजय झाला तरी इंग्लंडला तो विजय महाग पडला होता. हिंदी नेत्यांशी वाटाघाटी करून प्रश्न सोडवायला ब्रिटीश राज्यकर्ते उत्सुकच होते. यामुळे गांधीजींनीं वाटाघाटीपूर्वीची अटीची यादी सरकारने मान्य केली. ११ एप्रिल, १९४६ रोजी आगरा जेलमधून जयप्रकाश आणि लोहिया यांची सरकाराने मुक्तता केली. सर्व देशभर आनंदाचे वातावरण पसरले. तरूण वर्गामध्ये उत्साहाचे वातावरण झाले. भारतीय जनतेच्या हृदय सिंहासनावरील सम्राटपदावर जयप्रकाशांची अनभिषीक्त स्थापना झाली होती. बहादूर क्रांती नेत्यांचे स्वागत करायला जनता उत्सूक झाली होती.

११ एप्रिल १९४६ रोजी जयप्रकाशजींची आगरा जेलमधून सुटका झाली. १९४४ ला गांधीजींची सुटका झाली होती. राजकारणात निर्माण झालेली कोंडी फोडण्याच्या दृष्टीने गांधीजी प्रयत्न करत होते. जे.पीं. आगरातून सरळ दिल्लीला गेले. दिल्लीमध्ये कॅबिनेट मिशनचे सदस्य जे.पीं. ना भेटण्यासाठी इंपीरियल हॉटेलमध्ये आले होते. त्यांच्याबरोबर

जवळ जवळ एक तास बातचीत झाली. दिल्लीहून सरळ पाटणा येथे जाणार होते. जे.पीं. गंगा पार करून कृष्णाघाट पाटणा येथे आले. तरूण कार्यकर्ते डोळ्यात अश्रू घेऊन उभे होते. संध्याकाळी बांकींपूर मैदान मध्ये (गांधी मैदान) २१ एप्रिलला जयप्रकाशजींचे ९ ऑगस्ट चे क्रांतीदूत म्हणून अभिनंदन झाले. जयप्रकाश जिंदाबाद या नाऱ्यांनी त्यांचे स्वागत करण्यात आले होते.

महात्मा गांधीनी मुस्लीम लीगचे अध्यक्ष बॅ. जिना यांच्याशी वाटाघाटी करून मतैक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण जीनांचे मत बदलण्याचा हेतू गांधीजींचा अयशस्वी झाला. सेंट्रल असेंब्ली मधील कॉंग्रेस पक्षाचे नेते भुलाभाई देसाई व मुस्लीम लीगचे नेते लियाकतअली यांच्यात समझोता झाला होता. व्हाईसरॉय व्हेव्हेल यांनी देखील पेचप्रसंग सोडविण्याच्या दृष्टीने काही पाऊले टाकण्याची तयारी दर्शविली. पण इंग्लंडमध्ये युद्धोत्तर सार्वत्रिक निवडणूका होऊन हुजूर पक्षाचा पराभव झाला व मजूर पक्षाचे सरकार अधिकारी रुढ झाले. भारतीय पेचप्रसंग सोडविण्याच्या हेतूने भारतीय पुढाऱ्याशी बोलणी करण्यासाठी ब्रिटीश मजूर मंत्रीमंडळाने तीन मंत्र्याचे एक मंडळ भारतात पाठविले.

## २.१० देशाची फाळणी व जयप्रकाश नारायण :

मजूर पक्ष सत्तेवर आल्यावर ॲटली पंतप्रधान झाले. पाठवलेल्या शिष्टमंडळाने भारतीय नेत्याशी चर्चा केली. स्वतंत्र भारतात हिंदू बहुसंख्य असल्याने मुसलमानांना न्याय मिळणार नाही, त्याना गौणस्थान व दुय्यम स्थान व नागरीकत्व स्वीकारावे लागले. असा विषारी प्रचार करून बॅ. जीनांनी व मुस्लीम लीग यांनी पाकिस्तान निर्मितीचा आग्रह धरला. कॉंग्रेसच्यावतीने वाटाघाटी करणाऱ्या जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व मौलना आझाद यांनी ती स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

कॉंग्रेस वर्किंग कमिटीसमोर प्रस्ताव येताच म. गांधी, सरहद गांधी, खान अब्दुलजफार खान व जयप्रकाश यांनी त्याला विरोध केला. पण निर्णय झाला होता.

हिंदुस्थान, पाकिस्तान या प्रश्नावरून देशात दंगली सुरू झाल्या होत्या. गांधीजी म्हणाले होते की, ''माझ्या मृतदेहावरूनच तुम्हाला देशाचे तुकडे करावे लागतील.'' अशा स्थितीत जयप्रकाश व डॉ. राममनोहर लोहिया गांधीजींना भेटले व म्हणाले, ''आपण फाळणीला विरोध करूया'' गांधीजी म्हणाले, ''आपल्या नेत्यानी निर्णय स्वीकारला आहे. देशाची फाळणी झाली. आता आपणामध्ये गट पडू नयेत. जवाहर व सरदार या माझ्या हातातल्या दोन मोहरा हातातून सुटल्या. आता तुम्ही दोघे माझ्या हातातील मोहरा आहात. आपण शांतता प्रस्थापित करूया.''[३९] देशाच्या फाळणीला गांधींचा विरोध होता. पण नेहरू पुढे काय चालत नव्हते. काँग्रेसचे अध्यक्षपद जयप्रकाशांना देण्याची गांधीजींची सूचना नेहरूंनी आडमार्गाने टाळली. गांधींचा नाईलाज झाला.

अखेरीस माऊंटबॅटन योजनेनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थान स्वतंत्र झाला ! पण देशाची फाळणी झाली. गांधीजींना व जयप्रकाशांना अत्यंत दुर्दैव झाले. डॉ. राममोहन लोहिया यांनी या काळाची हकिकत प्रसिद्ध केली. पश्चिमी गटाचे व पूर्वेकडील गटाचे यामध्ये मुसलमानांचे मताधिक्य होण्याची शक्यता होती व गटातील राज्यांना गटात राहावयाचे किंवा नाही. हे १० वर्षानी ठरविण्याचा अधिकार दिला होता. स्थूलमानाने मान करून ३८९ सभासदांची समिती बनवण्याचा सल्ला दिला.

जयप्रकाशजींच्या भाषणात ते म्हणतात, की ब्रिटीश मंत्री हे आपणास स्वराज्य देण्यासाठी आलेले नाहीत तर काँग्रेस व मुस्लीम लीगमध्ये मध्यस्थी करण्यास आलेले आहेत. पण इंग्रज या मतभेदाचा फायदा उठवत आहेत. लीग ही इंग्रजांची मित्र आहे.

नेहरू पटेल आदि नेते सतांतर व स्वातंत्र्य दिनाच्या सोहळा करण्यात गुंतले होते. तर तिकडे महात्मा गांधी कलक, नाओखाली बिहार वगैरे ठिकाणी फिरून जातीय दंगलीची आग विझविण्याचे काम करत होते आणि या कामात समाजवादाचे सर्वात जासत सहकार्य मिळत होते. बिहारमधील जातीय दंगली व तणाव नष्ट करण्याची जबाबदारी जयप्रकाश व राममनोहर लोहिया यांच्यावर सोपविण्यात आली होती. पंजाब व बंगालमधील शीख-

हिंदूंच्या कत्तलीचा बदला म्हणून बिहारमध्ये मुसलमानाच्या कत्तली करण्यात आल्या. पण त्यावेळी पंतप्रधानांनी संतप्त होवून धमकी दिली, ''बिहारमध्ये मुसलमानांची कत्तल थांबली नाही तर बॉम्ब वर्षाव करून शांतता प्रस्थापित केली जाईल.'' धर्मांध खवळलेल्या बिहारच्या तरुणांनी पं. नेहरूंना घेराव घातला. झटापटीत नेहरूंचे कपडे फाटले. जयप्रकाशजींना आवडले नाही. ते मध्ये गेले व विद्यार्थ्यांना आवरून म्हणाले, ''पंडितजींजी माफी मागा'' आणि आश्चर्य घडले. संतप्त विद्यार्थी शांत झाले. त्यांनी पंडितजींची माफी मागितली. गांधीजींना उपवास केला. उत्सव साजरा केला नाही. कारण कामगार शेतकरी यांचे राज्याचे प्रतिबिंब नव्हते.

पुढे एकदा प्रकट आत्मपरीक्षण करताना जयप्रकाश म्हणाले, ''पाकिस्तान निर्मितीला संमंती देऊन एक चूक गांधीजींनी केली आणि गांधीजींचा सल्ला मानून गप्प बसलो ही दुसरी चूक मी केली.''[३२]

अशी मनाची परदर्शकता आणि कबूल करणारी हृदयाची उदारता असणारे जगामध्ये पहिले म. गांधी व दुसरे जयप्रकाश. काँग्रेस जनामध्ये अधिकार लालसा, भ्रष्टाचार व संधीसाधुपणा वाढू लागला. मानवी इतिहासामध्ये अत्यंत अमानूष असा घोर रक्तपात, बलात्कार आणि अत्याचार या उपखंडात घडले. माणूसकीचा अक्षरशः मुडदा पडला. १९४८ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात गांधीजीसमवेत जयप्रकाश दिल्लीला गेले. स्टेशनवर गांधीजींच्या स्वागतासाठी स्वतंत्र भारतात कुणीही काँग्रेस पुढारी आले नव्हते. सत्ता स्वीकारल्यानंतर काँग्रेसचे केवढे अध:पतन झाले होते याचा अंदाज जयप्रकाशजींना आला. हरिजनसाठी आपल्या लेखात गांधीनी संदेश लिहिला. सत्ता स्वीकारणारा एक राजकिय पक्ष असे काँग्रेसचे स्वरुप यापुढे न ठेवता ती विसर्जित करावी, तिचे अशा नि:स्वार्थी लोकसेवक संघामध्ये रुपांतर करावे, असा विचार लेखात देशासमोर माडला. राष्ट्रपित्याचे जणू ते मृत्यूपत्रच ठरले.

कारण ३० जानेवारी, १९४८ रोजी सायंकाळी प्रार्थनेला जात असताना स्वतंत्र भारताच्या राजधानी दिल्लीमध्ये महात्माजींचा खून झाला. जयप्रकाशजींना अतिशय दु:ख झाले. देशभर शोक प्रदर्शन झाले. जयप्रकाशजींनी राष्ट्राला सांस्कृतिक पूनर्स्थापनाचे आवाहन केले आता मोह संपला होता. काँग्रेसच्या महान कुटुंबातील सर्वांत जोडणारा प्रमुख दुवा निखळला होता. काँग्रेस सोशालिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांना यापूर्वी आपल्या नावातील 'कॉग्रेस' हा शब्द काढून टाकला. १९४८ च्या मार्च महिन्यात नाशिक येथे काँग्रेसमधून बाहेर पडून स्वतंत्र समाजवादी पक्ष उभारण्याचा निर्णय घेतला. गांधीजींच्या महानिर्वानानंतर दोनच महिन्यात जयप्रकाशजींनी स्वतंत्र वाटचाल सुरु केली.

जयप्रकाश आणखी एका ठिकाणी लिहितात की, "मला अजूनही काँग्रेस अध्यक्षांचे ते स्फूर्तीदायक आवाहन आठवते की ज्यात त्यांची काँग्रेस पुढारी पकडले गेल्यास प्रत्येक भारतीयाने नेता म्हणून वागावे असा संदेश दिला होता. मग जे लोक काँग्रेस अध्यक्षांच्या आदेश मानून स्वत: नेते बनले त्यांना तोंडगशी पाडणे उचीत आहे काय ? जर त्यांचे प्रयत्न यशस्वी झाले असतील तर श्रेय कॉग्रेसने घेतले नसते का ? त्यांना अपयश आले तर ते अपयशही काँग्रेसने स्वीकारावयाचे नको का ? "[३३]

असाच तेजोभंग तरूणांचा काँग्रेसच्या जेष्ठ गांधीवादी नेल्याने सातारा येथे भरलेल्या सेवादलाच्या भव्य मेळाव्यामध्ये जाहीर भाषणात केला होता. साताऱ्यामध्ये बेचाळीसच्या क्रांतीच्या उठाव मोठ्या प्रमाणात झाला होता. याच पार्श्वभूमीवर सातारा येथे गोळीबार मैदानावर मेळावा. आयोजित केला होता. १२ हजार तरूण होते. बेचाळीसच्या क्रांतीलाल साहसपूर्ण नेतृत्वामुळे जयप्रकाश तरूण वर्गामध्ये लोकप्रिय झाले होते. परंतु जयप्रकाशजींना कोणत्याही गोष्टीचा मोह नव्हता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प. जवाहरलाल नेहरुंनी उद्‌गार काढले होते. की, "माझ्यानंतर भारताचे भावी प्रधानमंत्री जयप्रकाश नारायण हे असतील." पडीत नेहरूंनी मंत्रीमंडळात सहभागी होण्याचे आवाहन केले. पण जे.पीं. नी ते नाकारले. पारदर्शक नि:स्वार्थी त्यागी आणि संयमी चारित्र्याचा महान आदर्श जयप्रकाश यांनी आपल्या

दांपत्य जीवनातही घालून दिला. राष्ट्रकवी रामधरीसिंग दिनकरनी ओजस्वी शब्दात त्यांनी जे.पीं. वर काव्य केले.

''सेनातपी । तू निर्भय प्रयाण कर
उद्याचा इतिहास तुझाच आहे ।
अमावस्येचे तारे विझत चालले आहेत
अन सारे आकाश तुण मोकळै आहे !
जयप्रकाश हे ऐतिहासिक क्रांतीचे नांव आहे !
बदलत्या परिवर्तनाचे नाव आहे.
भुकंप, तुफान याचे ते नाव आहे !
या साऱ्यांनी मुक्त अशा तारूण्याचे ते नाव आहे.
जयप्रकाश हे असे नाव आहे
ज्याला इतिहास मानाने मुजरा करेल
पुढे धावणाऱ्या काळाच्या छाताडावर
या महापुरूषाची पावले उमटणार आहेत ! ''[४३]

-----

## प्रकरण दुसरे

## संदर्भ ग्रंथ सूची


१) जयप्रकाश नारायण यांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग, चंद्रकांत पाटगांवकर, चर्चासत्र "जयप्रकाश नारायण" शिवाजी विद्यापीठ गांधी अभ्यास केंद्र.

२) जयप्रकाश नारायण : लेखक शशिकांत महाडेश्वर, शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती, २००२, पृष्ठ क्र. १२.

३) उपरोक्त, पृष्ठ क्र. १२.

४) जयप्रकाश : लेखक रामवृक्ष बेनीपुरी, उषा प्रकाशन, आवृत्ती १९७५, पृष्ठ क्र.४०.

५) लोकनायक जयप्रकाश : लेखक - बा.न. राजहंस, साधना प्रकाशन, पृष्ठ क्र.३२.

६) जयप्रकाश : लेखक - रामवृक्ष बेनीपुरी, उषा प्रकाशन, आवृत्ती, १९७५, पृष्ठ क्र.४३.

७) जयप्रकाश एक जिवनी : लेखक एल्टन और वेल्डी कार्फ अनुवादक केशवानंद राधाकृष्ण प्रकाशन, दिल्ली, पृष्ठ क्र.८०.

८) जयप्रकाश : लेखक - रामवृक्ष बेनीपुरी, उषा प्रकाशन, पृष्ठ क्र.४४.

९) लोकनायक जयप्रकाश : लेखक - वा.न. राजहंस, साधना प्रकाशन, पृष्ठ क्र. ३५.

१०) प्रकाशयात्री जयप्रकाश : लेखक - चंद्रकान्त पाटगांवर, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, आवृत्ती ७७, पृष्ठ क्र.२७.

११) उपरोक्त, पृष्ठ क्र.२७.

१२) जयप्रकाश नारायण यांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग : चंद्रकांत पाटगांवकर चर्चासत्र, जयप्रकाश नारायण, शिवाजी विद्यापीठ गांधी अभ्यास केंद्र.

१३) दि नॅशनल काल, २३ ऑक्टोबर, १९३९.

१४) एच्.पसिन द्वारा अभिनंदन ग्रंथ में अपने लेख, 'जीवनदानी', उध्दव पृष्ठ नं.८१, (लंडन च्या एनकाऊंटर पत्रिका मे-जून, १९५८ के अंक मे भी प्रकाशित)

१५) लोकनायक जयप्रकाश : लेखक बा.न. राजहंस, साधना प्रकाशन, पृष्ठ क्र.६०.

१६) जयप्रकाश : लेखक रामवृक्ष बेनीपुरी, आवृत्ती १९७५, उषा प्रकाशन, पृष्ठ क्र.६४.

१७) सम्राट बनाम : जयप्रकाश नारायण वाले मुकदमे में सिंहभुमी डीप्टी (पृष्ठ क्र. ६५,६६), कमिशनर की आदालत मे सरकार कि ओर मे बिस्टोपुर के सबइनिस्पेक्टर कि गवाही जो. सी. आई. डी. का रिपोर्टर था । अभिनंदन ग्रंथ.

१८) जयप्रकाश एक जीवनी : लेखक एल्टन और वेडी स्कार्फ, अनुवादक केशवानंद, राधाकृष्ण प्रकाशन, पृष्ठ क्र.११०.

१९) जयप्रकाश : लेखक रामवृक्ष बेनीपुरी, उषा प्रकाशन मुंगेर, आवृत्ती १९७५, पृष्ठ क्र. ६८.

२०) प्रकाशयात्री जयप्रकाश : लेखक चंद्रकांत पाटगांवकर, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, पृष्ठ क्र.३३.

२१) लोकनायक जयप्रकाश : लेखक - बा.न. राजहंस, साधना प्रकाशन, पृष्ठ क्र. ६४.

२२) जयप्रकाश नारायण :लेखक - शशिकांत महाडेश्वर, शब्दवेल प्रकाशन, पृष्ठ क्र. १५.

२३) प्रकाशयात्री जयप्रकाश : लेखक - चंद्रकांत पाटगांवकर, अजब पुस्तकालय, प्रकाशन, पृष्ठ क्र. ३९.

२४) लोकनायक जयप्रकाश : लेखक बा.न. राजहंस, साधना प्रकाशन, पृष्ठ क्र. ७४.

२५) उपरोक्त, पृष्ठ क्र.७४.

२६) जयप्रकाश : लेखक - लक्ष्मीनारायण लाल, दि मॅकमिलन कंपनी इंण्डिया लिमिटेड, १९७५, पृष्ठ क्र. १४३.

२७) लोकनायक जयप्रकाश : लेखक - बा.न. राजहंस, साधना प्रकाशन, पृष्ठ क्र.७९.

२८) उपरोक्त, पृष्ठ क्र. ८१.

२९) जयप्रकाश : डॉ. लक्ष्मीनारायण लाल, मैकमिलन कंपनी, पृष्ठ क्र. १४७.

३०) जयप्रकाश नारायण : लेखक - शशिकांत महाडेश्वर शब्दवेल प्रकाशन, २००२, पृष्ठ क्र. १७.

३१) उपरोक्त, पृष्ठ क्र. १८.

३२) उपरोक्त, पृष्ठ क्र. १८.

३३) गांधी अभ्यास केंद्र तर्फे ''जयप्रकाश नारायण टिकात्मक परिक्षण'', चर्चासत्र, शिवाजी विद्यापीठ, लेख – चंद्रकांत पाटगावकर, 'भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये जयप्रकाश यांचे योगदान, महान नेता – लोकनायक जयप्रकाश नारायण, लेखक - ग.प्र. प्रधान.'

-------